रजिस्ट्री सं० डी० एल०-33004/99 REGD. NO. D. L.-33004/99

# भारत का राजपत्र
# The Gazette of India

असाधारण
EXTRAORDINARY
भाग I—खण्ड 1
PART I—Section 1
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 167] नई दिल्ली, मंगलवार, जून 23, 2015/आषाढ़ 2, 1937
No. 167] NEW DELHI, TUESDAY, JUNE 23, 2015/ASADHA 2, 1937

## उपभोक्ता मामले, खाद्य और सार्वजनिक वितरण मंत्रालय

## (खाद्य एवं सार्वजनिक वितरण विभाग)

## अधिसूचना

नई दिल्ली, 23 जून, 2015

**सं. 1(5)/2015- एस. पी. I**— केन्द्रीय सरकार वर्तमान चीनी मौसम 2014-15 के लिए किसानों के गन्ना देयों के भुगतान को सरल बनाने की दृष्टि से एतद्द्वारा चीनी मिलों को आसान शर्तों पर कर्ज प्रदान करने की स्कीम को निम्न प्रकार से अधिसूचित करती है:—

1. **ऋण का उद्देश्य** -इस ऋण को केन्द्रीय सरकार द्वारा निर्धारित उक्त चीनी मौसम के लिए गन्ने की उचित और लाभकारी कीमत (एफआरपी) से संबंधित चीनी मौसम 2014-15 के लिए किसानों को गन्ना मूल्य बकाया का भुगतान करने हेतु उपयोग में लाया जाना है।

2. **ऋण देने की विधि और सीमा –**

i. बैंक स्वयं सचेत/संतुष्ट होने के पश्चात् चालू चीनी मौसम 2014-15 के लिए किसानों के गन्ना देयों के भुगतान को सरल बनाने हेतु 24000/- रू प्रति मी.टन की दर से 25 लाख मी.टन के स्टाक मूल्य के बराबर चीनी मिलों को आसान शर्तों पर ऋण प्रदान करेंगे। इस स्कीम के अंतर्गत जो अधिकतम ऋण उधार दिया जाएगा वह लगभग 6000 करोड़ रूपए होगा।

ii. बैंक केवल उन्हीं चीनी मिलों के ऋण आवेदनों पर विचार करेगा जिन्होंने एफआरपी के आधार पर की गई गणना के अनुसार चालू चीनी मौसम 2014-15 के लिए भुगतान योग्य गन्ना मूल्य का 30-06-2015 तक 50% का भुगतान कर दिया हो।

iii. यह उधार सभी संगत बैंकिंग मानकों, जिनमें समय-समय पर चीनी उद्योग के लिए आर बी आई द्वारा अधिसूचित दिशा-निर्देशों की पुनर्संरचना शामिल है, की शर्तों पर दिया जाएगा। यह ऋण जमानत द्वारा समर्थित होगा और ऋण की सुविधा लेने वाली चीनी मिलों के ऋणाधार, जिनमें व्यक्तिगत गारंटियां और संस्थापक की अन्य परिसंपत्तियां, जो सभी ऋणभारों से मुक्त हो, अलग-अलग बैंक द्वारा निर्धारित किया जाना है।

iv. एनपीए इकाइयां भी इस स्कीम के अंतर्गत आती है अगर संबंधित राज्य सरकारें उनके नए ऋण के लिए गारंटी देती है।

v. आसान शर्तों पर ऋण की मिल-वार प्रमात्रा को चीनी मौसम 2013-14 में श्वेत चीनी के बताए गए उनके उत्पादन का 11% को हिसाब में लेते हुए निर्धारित किया जाएगा और यह ऋण उन मिलों के लिए उपलब्ध होगा जिन्होंने कम-से-कम चीनी मौसम 2013-14 और 2014-15 में चीनी का उत्पादन किया हो।

vi. चीनी मिलों को चीनी मौसम 2013-14 के दौरान श्वेत चीनी के उत्पादन की मात्रा के बारे में संबंधित केन्द्रीय उत्पाद शुल्क प्राधिकारियों का प्रमाण पत्र, यह प्रमाणित करते हुए कि मिल ने चीनी मौसम 2013-14 और 2014-15 में चीनी का उत्पादन किया है, बैंक को प्रस्तुत करना होगा।

vii. चीनी मिलों को संबंधित चीनी/गन्ना आयुक्त से यह इंगित करते हुए बैंक को प्रमाण पत्र प्रस्तुत करना होगा कि मिल ने 30.06.2015 तक एफआरपी के आधार पर चालू चीनी मौसम 2014-15 के लिए भुगतान योग्य गन्ना मूल्य का कम-से-कम 50% भुगतान कर दिया है।

viii. एक बार जब ऋण स्वीकृत हो जाता है और इसके वितरण की आवश्यक औपचारिकताएं पूरी कर ली जाती हैं तो बैंक संबंधित चीनी मिल से किसानों की सूची उनके बैंक खातों के विवरणों, जिन्होंने बैंकिंग प्रणाली से क्रेडिट सुविधा प्राप्त की हुई है उन किसानों का उधार खाता संख्या तथा ऐसे किसानों, जिन्होंने क्रेडिट सुविधा प्राप्त नहीं की हुई है उनका नियमित बचत खाता या चालू खाता संख्या और एफआरपी के आधार पर परिकलन से भुगतान किए जाने वाले गन्ना देयों के परिमाण के साथ जानकारी प्राप्त करेगा और चीनी मिलों की ओर से आबंटित निधि को किसानों के खातों में सीधे जमा किया जाएगा।

ix. बैंकों को ऋण की राशि किसानों के खाते में संवितरण करते समय उनके खाते को आधार संख्या से जोड़ने का प्रयास करना चाहिए।

x. चीनी मिल के लिए उपलब्ध ऋण की राशि को किसानों के शेष बकायों, जिनके देय मिलों के पास लंबित है, यथानुपात आधार पर संविभाजित किया जाएगा।

xi. इस अधिसूचना के अनुसरण में ऋणदाता बैंकों द्वारा 30 सितंबर, 2015 तक जो ऋण स्वीकृत और संवितरित किया जाता है, वह ब्याज माफी स्कीम के अंतर्गत आएगा।

xii. वित्तीय सेवाएं विभाग (डीएफएस) नोडल बैंक की नियुक्ति सहित इस स्कीम का प्रचालन करने के लिए यथोचित अनुदेश जारी करेगा।

3. **ब्याज माफी की सीमा**

i. सरकार 10% तक के साधारण ब्याज या बैंक द्वारा लिए गए वास्तविक ब्याज, इनमें से जो भी कम हो, को अधिकतम एक वर्ष के लिए ब्याज माफी के जरिए ब्याज का भार वहन करेगी। उसके बाद, चीनी मिलें उधार लिए गए ऋण की वापसी करेंगी जिसके लिए उन्हें ब्याज का भार स्वयं वहन करना पड़ेगा।

ii. जुलाई, 2015 से आरंभ होने वाली पिछली तिमाही के लिए चीनी मिल के संबंध में ब्याज माफी केन्द्रीय सरकार द्वारा जून 2016 के अंत तक मिल द्वारा उपयोगिता प्रमाण पत्र प्रस्तुत किए जाने के उपरांत ही प्रदान की जाएगी। अगर कोई चीनी मिल उपयोगिता प्रमाण पत्र प्रस्तुत करने में असफल रहती है तो उसे ब्याज माफी का लाभ तब तक नहीं मिलेगा जब तक कि मिल द्वारा उपयोगिता प्रमाणपत्र जमा नहीं किया जाता।

iii. 1 अक्तूबर, 2015 से आरंभ होने वाली एक वर्ष की विलम्बन अवधि के दौरान पूर्व भुगतान पर विचार किया जाना है जिसे बैंक द्वारा निर्धारित किया जाना है तथा ऋण खाते पर डीएफपीडी की ब्याज माफी दायित्व में तदनुसार कमी हो जाएगी।

4. **केन्द्रीय सरकार द्वारा ब्याज माफी राशि के भुगतान की विधियां**

i. खाद्य एवं सार्वजनिक वितरण विभाग (डीएफपीडी) डीएफएस द्वारा नोडल बैंक को ब्याज माफी राशि अग्रिम रूप में जारी करेगा। ब्याज माफी की पहली किस्त अक्तूबर, 2015 में, तथा उसके बाद दूसरी, तीसरी और चौथी किस्त क्रमश: जनवरी 2016, अप्रैल 2016 और जुलाई 2016 में जारी की जाएगी।

ii. यह राशि अग्रिम तौर पर जारी की जाएगी बशर्ते कि पिछली तिमाही में बैंक द्वारा जारी राशि पर अर्जित ब्याज के साथ-साथ संवितरण के विवरणों को प्रस्तुत किया गया हो।

iii. डीएफपीडी द्वारा ब्याज माफी के लिए अग्रिम जारी निधियों को ब्याज वहन करने वाले खाते में रखा जाएगा ताकि इसके जारी होने की तारीख से संपूर्ण अवधि के लिए तथा संबंधित चीनी मिल के खाते में क्रेडिट होने तक इस राशि पर ब्याज अर्जित हो सके।

iv. ब्याज माफी पर हुए खर्च को संपूर्णत: एसडीएफ से पूरा किया जाएगा।

5. **उपयोगिता प्रमाण पत्र –**

संबंधित चीनी मिल को अपने से संबंधित चीनी/गन्ना आयुक्त द्वारा यह प्रमाणित करते हुए कि ऋण राशि का उपयोग स्कीम में विनिर्दिष्ट उद्देश्य के लिए कर लिया गया है, विधिवत रूप से प्रति-हस्ताक्षरित उपयोगिता प्रमाण पत्र प्रस्तुत करना होगा। राज्य चीनी/गन्ना आयुक्त भी ऋण के उपयोग की निगरानी करेंगे। जून, 2016 तक उपयोगिता प्रमाण पत्र जमा न किए जाने में चूक होने पर केन्द्रीय सरकार द्वारा ब्याज माफी की प्रतिपूर्ति नहीं की जाएगी।

प्रशांत त्रिवेदी, संयुक्त सचिव

## MINISTRY OF CONSUMER AFFAIRS, FOOD AND PUBLIC DISTRIBUTION

### (Department of Food and Public Distribution)

### NOTIFICATION

New Delhi, the 23rd June, 2015

**No. 1(5)/2015-S.P.-I.**—The Central Government, with a view to facilitate payment of cane dues of the farmers for the current sugar season 2014-15 hereby notifies the scheme for extending soft loan to sugar mills as under:

1. **Purpose of loan:** The loan is to be used for payment of cane price arrears of farmers for the sugar season 2014-15 relating to the Fair and Remunerative Price (FRP) of sugarcane fixed by the Central Government for that sugar season.

2. **Modalities and Extent of loan:**

(i). The banks will provide, after due diligence, soft loan to sugar mills to facilitate payment of cane dues of farmers for the current sugar season 2014-15 equivalent to stock value of 25 Lakh MT @ Rs. 24000/- per MT. The maximum loan that can be advanced under the scheme shall be about Rs.6000 crore.

(ii) The Bank will consider the loan application of only those sugar mills which have cleared at least 50% of the cane price payable for current sugar season 2014 –15 calculated on the basis of FRP by 30. 06.2015.

(iii) The lending will be subject to all relevant banking norms including restructuring guidelines as notified by RBI for the sugar industry from time to time. The loans will be backed by security and collateral of the sugar mill availing the loan including personal guarantees and other assets of promoters which are free from encumbrances to be decided by the individual banks.

(iv) The NPA units are also covered under the scheme provided the State Government concerned gives guarantee for their new loans.

(v) The mill-wise quantum of soft loan shall be determined by taking into account 11% of their reported production of white sugar in sugar season 2013-14 and this loan will be available to those mills which have at the least undertaken sugar production in the sugar seasons 2013-14 and 2014-15.

(vi) The sugar mills shall furnish to the banks a certificate from the central excise authorities concerned relating to the quantity of white sugar production during sugar season 2013-14 and certifying that the mill has undertaken sugar production in the sugar seasons 2013-14 and 2014-15.

(vii) The sugar mills shall also furnish to the banks a certificate from respective sugar/cane commissioner indicating that the mill has cleared at least 50% of the cane price payable on the basis of FRP for current sugar season 2014 –15 by 30. 06.2015.

(viii) Once the loan is sanctioned and necessary formalities for disbursal are completed, the Bank will obtain from the respective sugar mill the list of farmers along with bank account details, borrowable account numbers of farmers who have availed credit facility from the banking system, and regular saving bank or current account numbers in respect of farmers who have not availed any credit facility, and the extent of cane dues to be paid computed on the basis of FRP and shall directly remit the funds allocated into the accounts of farmers on behalf of the sugar mill.

(ix) The banks should endeavour to link aadhar number with the bank account of farmers.

(x) The loan amount available to a sugar mill shall be apportioned on a pro-rata basis in accordance with outstanding arrears of the farmers whose dues are pending with the mill.

(xi) All loans which are sanctioned and disbursed by 30th September, 2015 by the lending banks, pursuant to this notification, would be covered under the interest subvention scheme.

(xii) The Department of Financial Services (DFS) will issue suitable instructions to the banks to operationalize the scheme including appointment of a nodal bank.

3. **Extent of Interest Subvention:**

(i) The Government will bear interest burden up to 10% simple interest or actual rate of interest charged by the bank, whichever is less for maximum of one year by way of interest subvention. Thereafter, sugar mills will repay the loan advanced by the banks for which they will bear the interest burden.

(ii) The interest subvention in respect of a sugar mill for the last quarter commencing from July, 2016, would be provided by the Central Government only after utilisation certificate is furnished by the mill by end of June, 2016. If a sugar mill

fails to submit the utilization certificate, the benefit of interest subvention will not be available as long as the utilisation certificate is not submitted by the mill.

(iii) Pre-payment during moratorium period of one year commencing from 1st October, 2015, will be considered to be decided by the bank and the interest subvention liability of DFPD towards loan account would accordingly get reduced.

**4. Modalities of payment of interest subvention amount by Central Government:**

(i) The Department of Food and Public Distribution (DFPD) will release the interest subvention amount on quarterly basis in advance to the nodal bank as appointed by DFS. The first tranche of interest subvention will be released in October, 2015 followed by 2nd, 3rd, and 4th tranches respectively in January, 2016, April, 2016 and July, 2016.

(ii) The amount shall be released as advance subject to furnishing of disbursement particulars as well as interest earned by the bank on the amount released in the previous quarter. The interest earned on the subvention advance shall be adjusted in the quarterly instalments from 2nd quarter onwards.

(iii) Funds released by DFPD in advance towards interest subvention shall be parked in interest bearing accounts so that interest is accrued on this amount for the entire period commencing from the date of its release and till it is credited into the account of the respective sugar mills.

(iv) The expenditure on interest subvention would be entirely met from SDF.

**5. Utilization certificate:** The sugar mill concerned shall submit utilization certificate duly counter-signed by the respective sugar/cane commissioner certifying that the loan amount has been utilized for the purpose specified in the scheme. The State sugar/ cane commissioner shall also monitor the utilization of the loan. Any failure to submit the utilization certificate by June, 2016 shall lead to non-re-imbursement of interest subvention by the Central Government.

PRASHANT TRIVEDI, Jt. Secy.

Printed by the Manager, Government of India Press, Ring Road, Mayapuri, New Delhi-110064
and Published by the Controller of Publications, Delhi-110054.

शासनाने जाहीर केलेल्या सॉफ्टलोन योजनेत बसत नसलेल्या साखर कारखान्यांना ऊस पुरविण्याऱ्या शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दिर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदान देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक : शिकाना/ससाका-२०१५/प्र.क्र.३८५/३-स
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ०९ डिसेंबर, २०१५.

वाचा :- भारत सरकार, खाद्य व सार्वजनिक वितरण विभाग, नवी दिल्ली विभागाची अधिसूचना क्र. १(५)/२०१५/एस.पी.-I, दिनांक २३.०६.२०१५.

**प्रस्तावना :-**

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी केंद्र शासनाचे दि.२३/०६/२०१५ चे अधिसूचनेच्या अनुषंगाने मंत्रिमंडळाच्या दिनांक १२.०७.२०१५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शासन निर्णय दि.३०/०७/२०१५ अन्वये सदर सॉफ्टलोन योजनेकरीता पात्र १४७ साखर कारखान्यांच्या कर्ज रक्कमेवर व्याज अनुदानाबाबत निर्णय जारी केलेला आहे. तसेच शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१५ अन्वये फक्त सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या २२ साखर कारखान्यांसाठी राज्य शासनामार्फत व्याज अनुदानाबाबत निर्णय जारी केला आहे. राज्यातील काही साखर कारखान्यांना या दोन्ही योजनांचा लाभ मिळू शकलेला नाही. या कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना एफआरपी अदा करण्यासाठी शासनाने मदत द्यावी यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. या बाबीचा विचार करुन दिनांक ३१.०८.२०१५ पर्यंत एफआरपीची ५०% रक्कम दिलेल्या कारखान्यांना ऊस पुरविणाऱ्या शेतकऱ्यांना एफआरपीची उर्वरीत रक्कम अदा करण्यासाठी सॉफ्ट लोनवर व्याज अनुदान राज्य शासनामार्फत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

दिनांक ३१.०८.२०१५ पर्यंत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ५०% एफआरपीची रक्कम अदा केलेल्या जोडपत्र-१ मधील ६ कारखान्यांना ऊस पुरविणा-या शेतक-यांना एफआरपीची उर्वरीत रक्कम अदा करण्याकरिता मदत व्हावी म्हणून, दीर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदान देण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला :-

१) राज्यातील ज्या साखर कारखान्यांनी दिनांक ३१.०८.२०१५ अखेर ५०% पेक्षा जास्त एफआरपीची रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अदा केलेली आहे, अशा साखर कारखान्यांना एफआरपीची उर्वरीत रक्कम ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देता यावी, म्हणून राज्य शासनामार्फत सॉफ्टलोन योजनेचा लाभ देण्यात येत आहे.

२) बँकांमार्फत दि.३१/१२/२०१५ पर्यंत मंजूर व वितरीत केलेले कर्ज व्याज अनुदानास पात्र ठरतील. जे कारखाने त्यांच्या मुद्दलाची रक्कम वेळच्यावेळी भरणार नाहीत, त्यांना सदर योजनेतून तात्काळ वगळण्यात येईल आणि हप्ते थकवल्यापासूनचे राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान देण्यात येणार नाही.

३) सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार ५ वर्षाचा रेडयुसिंग बॅलन्सनुसार सरळ व्याजाचा भार राज्य शासनाने व्याज अनुदान म्हणून द्यावा. सदर ६ साखर कारखान्यांना प्रस्तावात नमूद केल्यानुसार उत्पादीत पांढऱ्या साखरेच्या ११% किंवा दिनांक ३१.०८.२०१५ अखेर (प्रलंबित उस देयक (-)उचल न केलेले तारण कर्ज) यापैकी जी रक्कम कमी असेल इतक्या कर्जास त्यांचे कर्ज उचल क्षमतेनुसार पात्र ठरण्यास मान्यता देण्यात यावी. त्यानुसार अंदाजे रु.३८३७.८० लाख इतक्या कर्ज रकमेस पात्र असून, या कारखान्यांना देय कर्जापोटीचे ५ वर्षांचे व्याज अनुदान म्हणून अंदाजे एकूण रु.११५१.३२ लाख इतका वित्तीय भार राहणार आहे. सदर वित्तीय भारास मान्यता देण्यात यावी.

**२. सदर योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत :-**

१) राज्यातील ६ साखर कारखाने (जोडपत्र-१) असे आहेत की, त्यांनी दिनांक ३१.०८.२०१५ अखेर एफआरपीची ५०% रक्कम दिली आहे. त्यांना राज्य शासनाच्या निधीतून व्याज अनुदान देणेसाठीची सदर योजना लागू करण्यात यावी.

२) या ६ साखर कारखान्यांपैकी ४ कारखान्यांच्या हंगाम २०१३-१४ मधील पांढऱ्या साखर उत्पादनाच्या ११% साखर साठ्याची किंमत आधारभूत धरण्यात यावी व उर्वरीत दोन साखर कारखान्याबाबत (महाडिक शुगर लि., जि. कोल्हापूर, व स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना लि. दहीटणे, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर) सन २०१४-१५ मधील दि. ३० जून, २०१५ पर्यंतच्या पांढऱ्या साखर उत्पादनाच्या ११% साखर साठयाची किंमत आधारभूत धरण्यात यावी. त्यानुसार सदर कारखान्यांच्या साखर उत्पादनाच्या ११% किंवा दिनांक ३१.०८.२०१५ अखेर (प्रलंबित उस देयक(-)उचल न केलेले तारण कर्ज) यापैकी जी रक्कम कमी असेल ती किंमत आधारभूत धरण्यात यावी. हे ६ साखर कारखाने प्रति टन रु. २४०००/- याप्रमाणे रु. ३८३७.८०लाख इतक्या कर्ज रकमेस पात्र आहेत. सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणा-या व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत राज्य शासन व्याज अनुदान देईल. सदर व्याज अनुदान वार्षिक स्वरुपात कारखान्यांना प्राप्त होईल. या कारखान्यांनी स्वतःहून बँकेस संपर्क साधून शेतकऱ्यांच्या प्रलंबित एफआरपीची अदायगीसाठी कर्ज मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. या कारखान्यांना देय कर्जापोटीचे ५ वर्षांचे व्याज अनुदान म्हणून अंदाजे रु. ११५१.३२लाख राज्य शासनाकडून देण्यात यावे.

३) गाळप हंगाम २०१४-१५ मधील एफ.आर.पी. प्रमाणे एकूण देय ऊस किंमतीच्या ५०% रक्कम दि.३१.०८.२०१५ अखेर ज्या कारखान्यांनी अदा केलेली आहे. अशा कारखान्यांने स्वत:चा कर्ज प्रस्ताव संबंधित कारखान्यांनी निवडलेल्या बँकांकडून मंजूर करुन घ्यायचा आहे. याबाबत साखर आयुक्तालयाकडील शेतकऱ्यांना देय FRP पोटी देय रक्कमेबाबत प्रमाणपत्र तसेच संबंधित केंद्रीय अबकारी विभागाकडून मिळालेले सन २०१४-१५ मधील साखर उत्पादनाबाबत प्रमाणपत्र कारखान्याने बँकेस सादर करावयाचे आहे.

४) शेतक-यांना द्यावयाच्या प्रत्यक्ष प्रलंबित ऊस किंमतीच्या प्रमाणात(Pro-rata) कारखान्यांना कर्ज मंजूर करण्याचा निर्णय बँक त्यांचे निकषाप्रमाणे घेणे अपेक्षित आहे.

५) जे कारखाने त्यांच्या मुद्दलाची रक्कम वेळच्यावेळी भरणार नाहीत, त्यांना सदर योजनेतून तात्काळ वगळण्यात येईल आणि हप्ते थकवल्यापासूनचे राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान देण्यात येणार नाही.

६) कर्ज मंजूरीची प्रक्रिया व इतर बाबींची पुर्तता झाल्यावर संबंधित बँकेने कारखान्याकडून एफ.आर.पी. प्रमाणे शेतक-यांना अदा करावयाची रक्कम व शेतक-यांचे बँक खाते याबाबत सर्व माहिती घेऊन संबंधित कारखान्याच्या वतीने शेतक-यांचे खात्यावर सदरची रक्कम जमा करावयाची आहे. शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग केलेल्या या रकमेवर व्याज अनुदान देण्यात येईल. याकरीता संबंधित शेतक-यांचे बँक खाते हे आधार क्रमांकाशी जोडण्यासाठी प्रयत्न करावा.

७) कारखान्याने सदर कर्जाबाबत विनियोग दाखला सादर केला, तरच राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान प्राप्त होईल. कारखाना विनियोग दाखला सादर करु न शकल्यास, जो पर्यंत विनियोग दाखला सादर केला जात नाही, तोपर्यंत व्याज अनुदान मिळण्यास कारखाना अपात्र ठरेल.

८) ५ वर्षाच्या कालावधीपूर्वी कारखान्यास कर्जाची संपूर्ण परतफेड करावयाची असल्यास, याबाबत संबंधित बँक निर्णय घेईल. तसेच कर्ज परतफेडीच्या कालावधीच्या प्रमाणात राज्य शासनाकडून प्राप्त होणारे व्याज अनुदान देण्यात येईल.

९) सदर कर्जाचा विनियोग हा एफआरपी अदा करण्यासाठी झाल्याबाबत कारखान्यांनी साखर आयुक्त यांनी प्रमाणित केलेला विनियोग दाखला सादर करावयाचा आहे. सदर दाखला सादर न करु शकणारे कारखाने व्याज अनुदानास पात्र होणार नाहीत.

१०) कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता साखर आयुक्त यांनी घ्यावी.

११) सदर निर्णयानुसार योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश साखर आयुक्त यांनी निर्गमित करावेत.

१२) बँकांमार्फत दि.३१/१२/२०१५ पर्यंत मंजूर व वितरीत केलेले कर्ज व्याज अनुदानास पात्र ठरतील.

१३) शासन निर्णय दिनांक ३०.०७.२०१५ व दिनांक ०५.०९.२०१५ अन्वये विहीत केलेल्या इतर अनुषंगिक अटी व शर्ती या प्रकरणी लागू होतील.

१४) ज्या साखर कारखान्यांनी एफआरपी अदायगीसाठी स्वत:चे साधन असतानाही एफआरपी दिली नसल्यास, त्यांचे विरुध्द साखर आयुक्तांनी नियमानुसार कारवाई करावी.

१५) उपरोक्त बाबीवरील होणारा खर्च लेखाशीर्ष-२४२५, सहकार, (००) १०८, इतर सहकारी संस्थांना सहाय्य (०३) सहकारी साखर कारखाने (०३) (०२) सहकारी साखर कारखान्यांना सहायक अनुदान, (२४२५०९८९) -३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या संबंधित वर्षाच्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ०१.१२.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४९६/१५/व्यय-२, दिनांक २०.११.२०१५ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१५१२१०१०४९५१६८०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Balasaheb Ishwar Sawant

Digitally signed by Balasaheb Ishwar Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Balasaheb Ishwar Sawant
Date: 2015.12.11 11:55:49 +05'30'

( बा.ई.सावंत )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई
७) प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा-१)/(लेखा व अनुज्ञेयता-१) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा-२)/(लेखा व अनुज्ञेयता-२) महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) सर्व जिल्हाधिकारी.
१२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
१३) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांच्या निदर्शनास आणावेत.
१४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१५) वित्त विभाग व्यय-२/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
१८) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक मर्या., मुंबई.
१९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., नरीमन पॉईंट-मुंबई.
२०) कार्यासन क्रमांक १६-स/१७-स/२२-स/२५-स,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) ३-स,संग्रहार्थ.

जोडपत्र-१

शासन निर्णय क्र. ससाका २०१५/प्र.क्र. ३८५/३स, ०९ डिसेंबर, २०१५

राज्याच्या योजनेकरीता साखर कारखान्यांची यादी

(दि. ३१/०८/२०१५ अखेरच्या ऊस दर देयबाकी अहवालानुसार)

| अ .क्र. | कारखान्याचे नाव | प्रकार | ऊस दर रक्कम (रु. लाखांत) | | | अदा न केलेल्या रकमेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | देय रक्कम | अदा केलेली रक्कम | थकबाकी | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | महाडिक शुगर्स लि., ता.राधानगरी, जि.कोल्हापूर | खाजगी | ३१३०.३८ | १५९७.०९ | १५३३.२९ | ४८.९८ |
| २ | स्वामी समर्थ सह.सा.का.लि. दहिटणे, ता. अक्कलकोट, जि.सोलापूर | सहकारी | ५१९५.६५ | ४२८६.६० | ९०९.०५ | १७.५० |
| ३ | माणगंगा सह.सा.का.लि.,सोनारसिध्दनगर, ता.आटपाडी, जि.सांगली | सहकारी | ३४६४.९३ | १८७५.१५ | १५८९.७८ | ४५.८८ |
| ४ | कुमुदा शेतकरी सह.सा.का.लि. शेवाळेवाडी, ता.कराड, जि.सातारा | खाजगी | ३७६१.२७ | २४७१.३३ | १२८९.९४ | ३४.३० |
| ५ | चोपडा शेतकरी सह.सा.का.लि. चहाडी, ता. चोपडा, जि.जळगाव | सहकारी | ४१५५.८० | २२४२.०६ | १९१३.७४ | ४६.०५ |
| ६ | महाराष्ट्र शेतकरी शुगर लि., श्री उत्तम नगर, साईखंड, ता.सोनपेठ, जि. परभणी | खाजगी | ५५६८.४० | ३९३३.१२ | १६३५.२८ | २९.३७ |
| | **एकूण** | | २५२७६.४३ | १६४०५.३५ | ८८७१.०८ | |

स्रोत :- साखर आयुक्त यांचेकडून प्राप्त पत्र दि. १५/१०/२०१५ नुसार.

*************

सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या साखर कारखान्यांस ऊस पुरविणा-या शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदान देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

शासन निर्णय क्रमांक : ससाका २०१५ /प्र.क्र.२२६अ/३-स

मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ५ सप्टेंबर, २०१५

**वाचा** :- १) भारत सरकार, खाद्य व सार्वजनिक वितरण विभाग, नवी दिल्ली विभागाची अधिसूचना क्र.१(५)/२०१५/एस.पी.-I, दिनांक २३.६.२०१५

२) शा.नि.क्र. ससाका २०१५/प्र.क्र. २२६/३-स, दिनांक ३०.७.२०१५ व शुध्दिपत्रक दि.१.८.२०१५

**प्रस्तावना :-**

सन २०१४-१५ च्या गाळप हंगामात शेतक-यांना ऊसाच्या एफआरपीची रक्कम देण्याकरिता मदत व्हावी म्हणून, केंद्र शासनाने दि.२३ जून, २०१५ रोजी सॉफ्ट लोन योजना जाहीर केली आहे. सदर योजनेस अनुलक्षून गाळप हंगाम २०१४-१५ मधील एफ.आर.पी. प्रमाणे एकुण देय ऊस किंमतीच्या ५० टक्के रक्कम दि. ३०/६/२०१५ अखेर ज्या कारखान्यांनी अदा केलेली आहे, तसेच ज्या कारखान्यांनी हंगाम २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये गाळप घेतले आहे, अशा राज्यातील पात्र सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना केंद्र शासनाने जाहीर केलेली योजना लागू करण्याबाबत दि.१२ जुलै, २०१५ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आलेल्या धोरणात्मक निर्णयानुसार दि. ३०/७/२०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. शासनाच्या असेही निदर्शनास आले की, राज्यातील २२ साखर कारखान्यांनी ५०% पेक्षा जास्त एफआरपीची रक्कम दिली आहे, मात्र सन २०१३-१४ मध्ये गाळप हंगाम घेतला नसल्यामुळे केंद्र शासनाच्या सॉफ्ट लोन योजने अंतर्गत हे कारखाने अपात्र ठरतात. ही बाब विचारात घेऊन सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेल्या या २२ साखर कारखान्यांस ऊस पुरविणा-या शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी केंद्र शासनाच्या सॉफ्ट लोन योजनेच्या धर्तीवर व्याज अनुदान राज्य शासनामार्फत लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

सन २०१४-१५ मध्ये गाळप हंगाम घेतलेले २२ कारखान्यांना ऊस पुरविणा-या शेतक-यांना एफआरपीची रक्कम अदा करण्याकरिता मदत व्हावी म्हणून, दीर्घ मुदतीचे कर्जावर व्याज अनुदान देण्याबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला.

१) राज्यातील ज्या २२ साखर कारखान्यांनी फक्त सन २०१४-१५ या वर्षाचा गाळप हंगाम घेतलेला आहे, तसेच ५०% पेक्षा जास्त एफआरपीची रक्कम ३० जून, २०१५ पर्यंत अदा केलेली आहे, अशा कारखान्यांना ऊस पुरविणा-या शेतक-यांना एफआरपीची रक्कम देता यावी, म्हणून सॉफ्ट लोन योजने अंतर्गत राज्य शासनामार्फत व्याज अनुदान देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार ५ वर्षाचा रेड्युसिंग बँलन्सनुसार सरळ व्याजाचा भार राज्य शासनाने व्याज अनुदान म्हणून देण्यास मान्यता येत आहे. सदर साखर कारखाने सन २०१४-१५ मधील उत्पादीत साखरेच्या ११% किंवा (प्रलंबित उस देयक(-)उचल न केलेले तारण कर्ज) यापैकी जी रक्कम कमी असेल, इतक्या कर्जास त्यांचे कर्ज उचल क्षमतेनुसार पात्र ठरतील. त्यानुसार या कारखान्यांना देय कर्जापोटीचे ५ वर्षाचे व्याज अनुदान रक्कमेस मान्यता देण्यात येत आहे.

३) जे कारखाने त्यांच्या मुद्दलाची रक्कम वेळच्यावेळी भरणार नाहीत, त्यांना सदर योजनेतून तात्काळ वगळण्यात येईल आणि हप्ते थकवल्यापासूनचे राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान देण्यात येणार नाही.

४) या कारखान्यांपैकी जे कारखाने NPA (Non Performing Assets ) आहेत,त्या साखर कारखान्यांना त्यांच्या कर्ज उचल क्षमतेच्या मर्यादेत देय अंदाजे रु.२८.४० कोटी इतक्या कर्जासाठी शासन हमी आवश्यकतेनुसार वित्त विभागाच्या मान्यतेने देण्यात येईल. त्यासाठी सदर कारखान्यांची व त्यांच्या संबंधित सचालकांची सामुहिक तसेच वैयक्तिक हमी देखील घेण्यात येईल. या कारखान्याच्या मत्तेवर बँकेसह शासनाचे समानतया भार (Pari passu charge )ठेवण्यात येईल.

२. सदर योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-

१) राज्यातील २२ ( ५ सहकारी व १७ खाजगी ) साखर कारखाने (जोडपत्र-१) असे आहेत की, त्यांनी दिनांक ३० जून, २०१५ अखरे एफआरपीची ५०% रक्कम दिली आहे. मात्र फक्त सन २०१४-१५ या वर्षाचा गाळप हंगाम घेतलेला आहे, त्यांना राज्य शासनाच्या निधीतून व्याज अनुदान देणेसाठीची सदर योजना लागू करण्यात यावी.

२) सदर २२ कारखान्यांनी सन २०१३-१४ मध्ये साखर उत्पादीत केलेली नसल्यामुळे, सन २०१४-१५ मधील दि. ३० जून, २०१५ पर्यंतच्या साखर उत्पादनाच्या ११ % किंवा (प्रलंबित उस देयक(-)उचल न केलेले तारण कर्ज) यापैकी जी रक्कम कमी असेल ती किंमत आधारभूत धरण्यात यावी. हे २२ साखर कारखाने प्रति टन रु. २४०००/- याप्रमाणे रु. १८७.७६ कोटी इतक्या कर्ज रकमेस पात्र आहेत. सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणा-या व्याजदरामधील जो दर कमी असेल, त्यानुसार जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत राज्य शासन व्याज अनुदान देईल. सदर व्याज अनुदान वार्षिक स्वरुपात कारखान्यांना प्राप्त होईल. या कारखान्यांनी स्वत:हून बँकेस संपर्क साधून कर्ज मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. या कारखान्यांना देय कर्जापोटीचे ५ वर्षांचे व्याज अनुदान म्हणून अंदाजे रु. ५६.३३ कोटी राज्य शासनाकडून देण्यात यावे.

३) या २२ कारखान्यांपैकी जे कारखाने NPA(Non Performing Assets) (जोडपत्र-१ भाग ब) आहेत. त्यांना देय कर्जासाठी शासन हमी आवश्यकतेनुसार वित्त विभागाच्या मान्यतेने देण्यात यावी. त्यासाठी सदर कारखान्यांची व त्यांच्या संबंधित संचालकांची सामुहिक तसेच वैयक्तिक हमीदेखील घेण्यात यावी.

४) गाळप हंगाम २०१४-१५ मधील एफ.आर.पी. प्रमाणे एकूण देय ऊस किंमतीच्या ५०% रक्कम दि.३०/०६/२०१५ अखेर ज्या कारखान्यांनी अदा केलेली आहे. अशा कारखान्यांने स्वत:चा कर्ज प्रस्ताव संबंधित कारखान्यांनी निवडलेल्या बँकांकडून मंजूर करुन घ्यायचा आहे. याबाबत साखर आयुक्तालयाकडील शेतकऱ्यांना देय FRP पोटी देय रक्कमेबाबत प्रमाणपत्र तसेच संबंधित केंद्रीय अबकारी विभागाकडून मिळालेले सन २०१४-१५ मधील साखर उत्पादनाबाबत प्रमाणपत्र कारखान्याने बँकेस सादर करावयाचे आहे.

५) शेतक-यांना द्यावयाच्या प्रलंबित ऊस किंमतीच्या प्रमाणात(Pro-rata) कारखान्यांना कर्ज मंजूर करण्याचा निर्णय बँक त्यांचे निकषाप्रमाणे घेणे अपेक्षित आहे.

६) जे कारखाने त्यांच्या मुद्दलाची रक्कम वेळच्यावेळी भरणार नाहीत, त्यांना सदर योजनेतून तात्काळ वगळण्यात येईल आणि हप्ते थकवल्यापासूनचे राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान देण्यात येणार नाही.

७) कर्ज मंजूरीची प्रक्रिया व इतर बाबींची पुर्तता झाल्यावर संबंधित बँकेने कारखान्याकडून एफ.आर.पी. प्रमाणे शेतक-यांना अदा करावयाची रक्कम व शेतक-यांचे बँक खाते याबाबत सर्व माहिती घेऊन संबंधित कारखान्याच्या वतीने शेतक-यांचे खात्यावर सदरची रक्कम जमा करावयाची आहे. याकरीता संबंधित शेतक-यांचे बँक खाते हे आधार क्रमांकाशी जोडण्यासाठी प्रयत्न करावा.

८) कारखान्याने सदर कर्जाबाबत विनियोग दाखला सादर केला, तरच राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान प्राप्त होईल. कारखाना विनियोग दाखला सादर करु न शकल्यास, जो पर्यंत विनियोग दाखला सादर केला जात नाही तोपर्यंत व्याज अनुदान मिळण्यास कारखाना अपात्र ठरेल.

९) दिनांक १/१०/२०१५ पासून सुरु होणा-या कर्ज परतफेडीस, ५ वर्षाच्या कालावधीपूर्वी कारखान्यास कर्जाची संपूर्ण परतफेड करावयाची असल्यास, याबाबत संबंधित बँक निर्णय घेईल. तसेच कर्ज परतफेडीच्या कालावधीच्या प्रमाणात राज्य शासनाकडून प्राप्त होणारे व्याज अनुदान देण्यात येईल.

१०) सदर कर्जाचा विनियोग हा एफआरपी अदा करण्यासाठी झाल्याबाबत कारखान्यांनी साखर आयुक्त यांनी प्रमाणित केलेला विनियोग दाखला सादर करावयाचा आहे. सदर दाखला सादर न करु शकणारे कारखाने व्याज अनुदानास पात्र होणार नाहीत.

११) सदर योजना केंद्र शासनाची अधिसूचना आणि या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राबविण्यात येईल. तसेच कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता साखर आयुक्त यांनी घ्यावी.

१२) सदर निर्णयानुसार योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबत केंद्र शासनाच्या दि. २३ जून, २०१५ च्या अधिसूचनेनुसार सविस्तर आदेश साखर आयुक्त यांनी निर्गमित करावेत.

१३) बँकांमार्फत दि.३०/०९/२०१५ पर्यंत मंजूर व वितरीत केलेले कर्ज व्याज अनुदानास पात्र ठरतील.

१४) केंद्र शासनाच्या अधिसूचनेतील गाळप हंगामाबाबतची अट व त्यानुषंगाने आवश्यक बदल वगळता इतर अटी व शर्ती जशाच्या तशा लागू राहतील.

१५) ज्या साखर कारखान्यांनी एफआरपी अदायगीसाठी स्वत:चे साधन असतानाही एफआरपी दिली नसल्यास, त्यांचे विरुध्द साखर आयुक्तांनी नियमानुसार कारवाई करावी.

१६) उपरोक्त बाबीवरील होणारा खर्च लेखाशीर्ष-२४२५, सहकारी, (०३)सहकारी साखर कारखाने (०३) (०२) सहकारी साखर कारखान्यांना सहायक अनुदान, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२४२५०९८९) या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ ते सन २०१९-२० या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या संबंधित वर्षाच्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक २५.८.२०१५ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३५८/१५/व्यय-२, तसेच अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७०/अर्थबळ, दिनांक ५.९.२०१५ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१५०९०५१५४२१५०९०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Balasaheb Ishwar Sawant

Digitally signed by Balasaheb Ishwar Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Balasaheb Ishwar Sawant
Date: 2015.09.07 12:31:13 +05'30'

( बा.ई.सावंत )

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

२. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

३. मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव

४. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई

५. मा. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई

६. प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा-१)/(लेखा व अनुज्ञेयता-१) महाराष्ट्र राज्य, मुंबई

७. प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा-२)/(लेखा व अनुज्ञेयता-२) महाराष्ट्र राज्य, नागपूर

८. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

९. साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे

१०.सर्व जिल्हाधिकारी

११.सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था

१२.सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांच्या निदर्शनास आणावेत.

१३.जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व)

१४.वित्त विभाग व्यय-२/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई

१५.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई

१६.वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे

१७.अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक मर्या., मुंबई

१८.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., नरीमन पॉईंट-मुंबई

१९.कार्यासन क्रमांक १६-स/१७-स/२२-स/२५-स,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई

२०. ३-स,संग्रहार्थ

**********************

जोडपत्र - १

शासन निर्णय क्र. ससाका २०१५/प्र.क्र. २२६अ/३स. दि. ५ सप्टेंबर, २०१५

| अ.क्र. | कारखान्याचे नांव | प्रकार | ऊस दर रक्कम (रु. लाखात) | | | अदा न केलेल्या रकमेची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | देय रक्कम | अदा केलेली रक्कम | थकबाकी | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | सर सेनापती संताजी घोरपडे शुगर इंडस्ट्रिज लि., बेलवडी, ता. कागल, जि. कोल्हापूर | खाजगी | 11281.90 | 10151.20 | 1130.70 | 10.02 |
| 2 | ग्रीन पॉवर शुगर लि., गोपुज, ता. खाटाव, जि. सातारा | खाजगी | 12048.47 | 12048.47 | 0.00 | 0.00 |
| 3 | लोकनेते बाबुराव पाटील ॲग्रो इंडस्ट्रिज लि., लक्ष्मीनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर | खाजगी | 15668.75 | 11948.71 | 3720.04 | 23.74 |
| 4 | भैरवनाथ शुगर वर्क्स लि., लवंगे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | खाजगी | 7289.08 | 5093.49 | 2195.59 | 30.12 |
| 5 | युटोपियन शुगर्स लि., कचरेवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | खाजगी | 7760.99 | 6847.93 | 913.06 | 11.76 |
| 6 | शंकररत्न शुगर (शिवरत्न उद्योग) लि., अलेगांव, ता. माढा, जि. सोलापूर | खाजगी | 3400.27 | 2636.53 | 763.74 | 22.46 |
| 7 | बबनरावजी शिंदे शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि., तुर्क पिंपरी, ता. बार्शी, जि. सोलापूर | खाजगी | 3459.96 | 1768.07 | 1691.89 | 48.90 |
| 8 | गणेश ( डॉ. वि.वि.पाटील - प्रवरानगर) सह.सा.का. लि., रांजणगांव, ता. राहाता, जि. अहमदनगर | सहकारी | 6538.15 | 5497.34 | 1040.81 | 15.92 |
| 9 | पियुष (नगर तालुका) शुगर लि., वाळकी, ता. जि. अहमदनगर | खाजगी | 2745.00 | 2745.00 | 0.00 | 0.00 |
| 10 | संत मुक्ताई शुगर ॲन्ड एनर्जी लि., घोडसगांव, ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव | खाजगी | 1506.69 | 1524.32 | 0.00 | 0.00 |
| 11 | संत एकनाथ - सचिन घायाळ शुगर मिल्स लि., संत एकनाथ नगर, ता. पैठण, जि. औरंगाबाद | खाजगी | 3950.55 | 3559.05 | 391.50 | 9.91 |
| 12 | समर्थ सह.सा.का. लि., युनिट-2 (सागर) तीर्थपुरी, ता. घनसांगवी, जि. जालना | सहकारी | 5412.71 | 4534.21 | 878.50 | 16.23 |
| 13 | श्रध्दा एनर्जी ॲन्ड इन्फास्ट्रकश्चर्स प्रा. लि., ता. परतुर, जि. जालना. | खाजगी | 2744.08 | 2888.80 | 0.00 | 0.00 |
| 14 | छत्रपती सह. सा.का. लि., सोनाजीनगर- सावरगांव, ता. माजलगांव, जि. बीड | सहकारी | 1712.30 | 1524.30 | 188.00 | 10.98 |
| 15 | रत्नप्रभा शुगर्स- रेणुका शुगर्स लि., पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी | खाजगी | 2388.54 | 2171.37 | 217.17 | 9.09 |
| 16 | बळीराजा साखर कारखाना लि., कनदखेड, ता. पुर्णा, जि. परभणी. | खाजगी | 2172.21 | 2096.80 | 75.41 | 3.47 |
| 17 | कुंटुरकर शुगर ॲन्ड ॲग्रो प्रा. लि., मोहननगर कुंटुर, ता. नायगांव, जि. नांदेड | खाजगी | 2533.60 | 2436.11 | 97.49 | 3.85 |
| 18 | कंचेश्वर शुगर लि., मंगरुळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद | खाजगी | 4550.45 | 4276.92 | 273.53 | 6.01 |
| 19 | विकास (प्रियदर्शनी) सह. सा.का.लि., युनिट-2 तोंडार, ता. उदगीर, जि. लातूर | सहकारी | 5062.18 | 4870.95 | 191.23 | 3.78 |
| अ) | एकूण | | 102225.87 | 88619.57 | 13768.65 | |

**जोडपत्र-१ भाग- ब**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 20 | श्री साईकृपा शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि., युनिट-1, देवदैठण, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | खाजगी | 4816.38 | 4736.06 | 80.32 | 1.67 |
| 21 | श्री साईकृपा शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि., युनिट-2, हिरडगांव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | खाजगी | 9092.14 | 5222.59 | 3869.55 | 42.56 |
| 22 | जय भवानी सह.सा.का. लि., शिवाजीनगर गढी, ता. गेवराई, जि. बीड | सहकारी | 4497.62 | 3927.42 | 570.20 | 12.68 |
| ब) | एकूण | | 18406.13 | 13886.07 | 4520.07 | |
| | | | | | | |

टिप:- साखर आयुक्त, पुणे यांचे पत्र क्रमांक साआ/सॉफ्ट लोन-२०१५/कक्ष-७/अर्थ-२/१५ दिनांक16.07.2015 अन्वये प्राप्त माहितीनुसार

साखर कारखान्यास ऊस पुरविणा-या शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत- व्याज अनुदान.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांक: ससाका २०१५/प्र.क्र.२२६/३-स
मंत्रालय विस्तार,मुंबई-४०००३२,
दिनांक : ३० जुलै, २०१५

वाचा:- भारत सरकार ,खाद्य व सार्वजनिक वितरण विभाग, नवी दिल्ली विभागाची अधिसूचना क्रमांक १(५)/२०१५/एस.पी.I, दिनांक २३.६.२०१५.

**प्रस्तावना :-**

ऊस गाळप हंगाम २०१४-१५ मध्ये १०.५४ लाख हेक्टर क्षेत्रावर ऊसाची नोंद झालेली होती. सन २०१४-१५ गाळप हंगामामध्ये एकूण १७८ साखर कारखान्यांनी ऊस गाळप केलेले असून त्यामध्ये ९९ सहकारी साखर कारखाने आणि ७९ खाजगी साखर कारखान्यांचा सहभाग आहे. हंगाम अखेर ९२९.५४ लाख मे.टन ऊसाचे गाळप होऊन ११.२८ सरासरी उता-याने १०४.८३ लाख मे.टन साखर उत्पादित झालेली आहे. सन २०१४-१५ च्या गाळप हंगामात शेतक-यांना ऊसासाठी एफआरपीची रक्कम देण्याकरिता मदत व्हावी, म्हणून केंद्र शासनाने दिनांक २३ जून २०१५ रोजी सॉफ्ट लोन योजना जाहीर केली आहे. सदर योजनेतील तरतुदीनुसार राज्यातील १४७ कारखाने या योजनेंतर्गत पात्र ठरत आहेत. सदर योजनेत पात्र असलेल्या साखर कारखान्यांना त्यांनी गाळप हंगाम सन २०१३-१४ मध्ये उत्पादित केलेल्या पांढ-या साखरेच्या ११% साठ्यावर प्रति मे. टन रु.२४०००/- प्रमाणे बँकांकडून कर्ज उपलब्ध करुन देण्यास, तसेच सदर कर्जावर प्रथम एक वर्षाचे १०% प्रमाणे व्याज केंद्र शासनामार्फत अनुदान म्हणून देण्याची तरतूद आहे. सदर योजनेंतर्गत पात्र साखर कारखान्यांना राज्य शासनामार्फत मदत देण्याची बाब विचारात घेऊन राज्यातील साखर कारखान्यांना ऊस पुरविणा-या शेतक-यांना एफआरपीची रक्कम देण्याकरिता, सदर योजना राज्यातील पात्र १४७ साखर कारखान्यांनाही लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

राज्यातील साखर कारखान्यांना ऊस पुरविणा-या शेतक-यांना एफआरपीची रक्कम अदा करण्याकरिता मदत व्हावी म्हणून साखर कारखान्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज उपलब्ध करुन देण्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे:-

१. केंद्र शासनाने दिनांक २३.०६.२०१५ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार राज्यातील पात्र १४७ सहकारी व खाजगी(जोडपत्र-१) साखर कारखान्यांना या अधिसूचनेतील तरतूदी लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार पात्र १४७ साखर कारखान्यांना प्रथम वर्षाकरीता १०% प्रमाणे व्याज सवलत केंद्र शासनाकडून प्राप्त होणार आहे व सदर १४७ कारखान्यांना पुढील ४ वर्षाकरीता १०% व्याज सवलत राज्य शासनातर्फे देण्यात येत आहे.

३. जे कारखाने त्यांच्या मुद्दलाची रक्कम वेळच्यावेळी भरणार नाहीत. त्यांना सदर योजनेतून तात्काळ वगळण्यात येईल आणि हप्ते थकल्यापासूनचे, राज्य शासनाकडून अनुज्ञेय होणारे व्याज अनुदान देण्यात येणार नाही.

४. केंद्र शासनाच्या योजनेप्रमाणे जे पात्र कारखाने NPA मध्ये आहेत, त्या साखर कारखान्यांची केंद्र शासनाच्या योजनेतील तरतूदीच्या अधीन राहून संचालकांची सामुहीक व वैयक्तिक हमी घेवून शासन हमी देण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.

२. सदर योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-

(१) राज्यातील ऊस उत्पादक शेतक-यांना एफआरपीची रक्कम देण्यासाठी मदत व्हावी म्हणून केंद्र शासनाने दि. २३ जून, २०१५ रोजी निर्गमित केलेल्या अधिसूचनेनुसार राज्यातील पात्र १४७ सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना केंद्र शासनाने सदर अधिसूचनेन्वये जाहिर केलेली योजना लागू करण्यात यावी. पात्र साखर कारखान्यांना त्यांनी हंगाम सन २०१४-१५ मध्ये उत्पादीत केलेल्या पांढऱ्या साखरेच्या ११% साठ्यावर प्रती मे.टन. साठ्यावर रु.२४०००/- प्रमाणे सदर योजनेतर्गंत पात्र कारखान्यांना एकूण अनुज्ञेय कर्जाची रक्कम साधारणपणे रु. १९८२.९७ कोटी इतकी आहे.

(२) प्रथम वर्षाच्या कर्जावरील सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार होणारी रक्कम केंद्र शासन अनुदान म्हणून देईल. त्यानंतर उर्वरीत कर्जावरील (Reducing Balance प्रमाणे)सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याजदर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार होणारी रक्कम पुढील ४ वर्षापर्यंत व्याज अनुदान म्हणून राज्य शासन देईल.

(३) राज्यातील जे (जोडपत्र-२) पात्र कारखाने NPA( Non Performing Assets) आहेत, त्या साखर कारखान्यांना अनुज्ञेय रु.११५.५३कोटी कर्जासाठी शासन हमी आवश्यकतेनुसार देण्यात यावी. सदर कर्जास संबंधित कारखान्यांची व त्यांच्या संबंधित संचालकांची सामुहिक तसेच वैयक्तिक हमी देखील घेण्यात येईल व Security संदर्भात व इतर शर्ती यथावकाश केले जातील. अशाप्रकारे हमी घेतल्यास सदर साखर कारखान्यांना व्याज अनुदानाचा लाभ देय राहील.

(४) सदरचे कर्ज हे बँकिंगच्या प्रचलीत नियमानुसार अदा करावयाचे असून, कर्जास संबंधित कारखान्यानी व संबंधित संचालकांची सामुहिक तसेच वैयक्तिक हमी घेण्यात येईल.

(५) कारखान्यांनी गाळप हंगाम २०१३-१४ मध्ये उत्पादीत केलेल्या पांढ-या साखरेबाबत तसेच हंगाम २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये गाळप घेतलेबाबत संबंधित केंद्रीय अबकारी विभागाकडून मिळालेले प्रमाणपत्र संबंधित बँकेस सादर करणे आवश्यक राहील.

(६) कर्ज मंजूरीची प्रक्रिया व इतर बाबींची पुर्तता झाल्यावर संबंधित बँक कारखान्याकडून एफ.आर.पी. प्रमाणे शेतक-यांना अदा करावयाची रक्कम व शेतक-यांचे बँक खाते याबाबत सर्व माहिती घेऊन संबंधित कारखान्याच्या वतीने शेतक-यांचे खात्यावर सदरची रक्कम जमा करेल. याकरीता संबंधित शेतक-यांचे बँक खाते आधार क्रमांकाशी जोडणेबाबत बँकांनी प्रयत्न करावा.

(७) शेतक-यांना द्यावयाच्या प्रलंबित ऊस किंमतीच्या प्रमाणात कारखान्यांना कर्ज मंजूर करण्यात यावे.

(८) केंद्र शासनाच्या दिनांक २३.०६.१५ च्या अधिसूचनेनुसार बँकांमार्फत दि.३०/०९/२०१५ पर्यंत मंजूर व वितरीत केलेले कर्ज व्याज अनुदानास पात्र ठरतील.

(९) केंद्र शासन वित्तीय सेवा विभागामार्फत सदर योजनेच्या अंमलबजावणी बाबत बँकांना मार्गदर्शक सूचना तसेच नोडल बँक नेमणूकीबाबत कार्यवाही करीत आहे. त्यानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

या योजनेअंतर्गत १२७ कारखान्यांनी रु.१५९१.०० कोटी सॉफ्ट लोन उचल केली आहे. कर्ज मंजूरीची मुदत दि.३०/९/२०१५ आणि वितरणाची मुदत दि. १६/१०/२०१५ होती.

**२) शासन निर्णय दि. ५/९/२०१५ नुसार सॉफ्ट लोन योजना :-**

राज्यातील ज्या साखर कारखान्यांनी गाळप हंगाम २०१४-१५ मधील एफआरपीप्रमाणे एकूण देय रकमेच्या ५०% पेक्षा जास्त एफआरपीची रक्कम दि.३०.०६.२०१५ पर्यंत दिली आहे, मात्र सन २०१३-१४ मध्ये गाळप हंगाम घेतला नाही, अशा केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार उपरोक्त योजनेत अपात्र ठरणा-या २२ सहकारी व खाजगी साखर कारखान्यांना शेतक-यांच्या FRP ची रक्कम देता यावी, म्हणून ही योजना राज्य शासनाने लागू केली. या साखर कारखान्यांना सन २०१४-१५ मधील दि. ३०जून, २०१५ पर्यंतच्या उत्पादित पांढ-या साखरेच्या ११% साखर साठयाच्या प्रति मे. टनाप्रमाणे किंवा (प्रलंबित ऊस देयक(-) उचल न केलेले तारण कर्ज) यापैकी जी रक्कम कमी असेल, इतक्या कर्जास त्यांचे कर्ज उचल क्षमतेनुसार पात्र ठरतील आणि या पात्र कर्जापोटीचे सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याज दर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार रेडयुसिंग बॅलंसनुसार जास्तीत जास्त ५ वर्षाचे व्याज अनुदान राज्य शासनाने देण्याचा निर्णय दि. ५ सप्टेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. त्यानुसार रु.१८७.७६ कोटी पात्र कर्ज रकमेवरील ५ वर्षाचे व्याज अनुदानासाठी रु.५६.३३ कोटी भार मंजूर करण्यात आला आहे.

या योजनेअंतर्गत कर्ज मंजूरी व वितरणाची मुदत अनुक्रमे दि.३०/९/२०१५ व दि.१६/१०/२०१५ होती. या मुदतीत ७ कारखान्यांनी रु.६७.८४कोटी इतके कर्ज बँकांकडून घेतले आहे.

**३) शासन निर्णय दि.९/१२/२०१५ नुसार सॉफ्ट लोन योजना:-**

उपरोक्त दोन्ही योजनांचा लाभ मिळू न शकलेल्या आणि दि.३१/८/२०१५ पर्यंत ५०% पेक्षा जास्त एफआरपीची रक्कम अदा केलेल्या ६ साखर कारखान्यांना राज्य शासनाने सदर योजना लागू केली. त्यांनी उत्पादित केलेल्या पांढ-या साखरेच्या ११% उत्पादनाच्या प्रती मे.टन रु.२४०००/- प्रमाणे ( दोन्ही वर्षे गाळप हंगाम घेतलेल्या कारखान्यांसाठी सन २०१३-१४ मधील उत्पादनाच्या ११% आणि २०१३-१४ चा गाळप हंगाम न घेतलेल्या दोन कारखान्यांसाठी दि. ३०/६/२०१५ पर्यंतच्या पांढऱ्या साखरेच्या उत्पादनाच्या ११%) किंवा दि.३१/०८/२०१५ अखेर (प्रलंबित ऊस देयक (-) उचल न केलेले तारण कर्ज) यापैकी जी रक्कम कमी असेल, इतक्या कर्जास त्यांचे कर्ज उचल क्षमतेनुसार पात्र ठरतील आणि या पात्र कर्जापोटीचे सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याज दर यामधील जो दर कमी असेल, त्यानुसार रेडयुसिंग बॅलंसनुसार ५ वर्षाचे व्याज अनुदान राज्य शासनातर्फे देण्याचा निर्णय घेण्यात आला. या अंतर्गत रु.३८ कोटी इतकी कर्ज पात्र रक्कम आणि रु.११.५१ कोटी इतका ५ वर्षाचा व्याज अनुदानाचा भार मंजूर करण्यात आला आहे.

या योजनांतर्गत कर्ज मंजूरी व वितरणाची मुदत दि.३१/१२/२०१५ होती.

०२. उपरोक्त तिन्ही योजनांचा लाभ फक्त पांढ-या साखर उत्पादनाच्या आधारे ठरविलेल्या पात्र कर्ज मर्यादेनुसार देण्यात आला. त्यामुळे कच्ची साखर उत्पादित केलेल्या साखर कारखान्यांना पुरेसा लाभ मिळू शकला नाही. अशा साखर कारखान्यांकडून कच्च्या साखरेच्या उत्पादनाचाही कर्ज पात्र मर्यादा ठरविताना विचार व्हावा अशी मागणी आहे. तसेच यापूर्वीच्या योजनांमध्ये पात्र असूनही तांत्रिक कारणामुळे योजनेचा लाभ मिळू शकला नाही असे ४२ कारखाने आहेत. अशा कारखान्यांनी सदर योजनांसाठीची कर्ज मंजूर व वितरण मुदत वाढविण्याची मागणी केली आहे. त्याचबरोबर ज्या साखर कारखान्यांनी एफआरपीची रक्कम स्वत:हून दिली होती. त्यांनी सदर सॉफ्ट लोन योजनांचा लाभ त्यांना देखील दयावा आणि त्यांचे कर्ज पात्र

मर्यादेनुसार सॉफ्ट लोनची रक्कम इतर प्रयोजनासाठी वापरण्यास परवानगी देण्याची मागणी केली आहे. या सर्व बाबीचा विचार करुन यापूर्वीच्या तीनही सॉफ्टलोन योजनांची कर्ज उचल व वितरणाची मुदत वाढविणे. कर्ज पात्र रकमेतील उर्वरीत रक्कम कारखान्याच्या खात्यावर वर्ग करण्यास अनुमती देणे. तसेच कच्च्या साखरेच्या उत्पादनाचा विचार कर्ज पात्र मर्यादा ठरविण्यासाठी करणे व त्यावर व्याज अनुदान देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय:-

शासनाने जाहीर केलेल्या सॉफ्ट लोन योजनेचा लाभ मिळू न शकलेल्या कारखान्यांस ऊस पुरविण्या-या शेतक-यांच्या एफआरपीची उर्वरित रक्कम अदा करण्यासाठी या पूर्वीच्या योजनास मुदतवाढ देणे; कर्ज पात्र रकमेतील उर्वरित रक्कम कारखान्यांच्या खात्यावर वर्ग करणे, तसेच कच्च्या साखरेच्या उत्पादनाचा कर्ज पात्र रक्कम ठरवितांना विचार करणे यासाठी सॉफ्टलोन योजना-व्याज अनुदान याबाबत शासनाने राज्यमंत्रिमंडळाच्या दिनांक ०६.०४.२०१६ रोजीच्या बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

(१) **विहित मुदतीत सॉफ्ट लोन मंजूर व वितरण न झालेल्यांसाठी मुदतवाढ:-** ऊस उत्पादक शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम देता यावी म्हणून शासन निर्णय दि.३०/७/२०१५, दि.५/९/२०१५ व दि.९/१२/२०१५ अन्वये एकूण १७६ साखर कारखान्यांसाठी लागू केलेल्या सॉफ्टलोन योजनेअंतर्गत कर्ज मंजूरी व वितरणाची मुदत दि. ३१ मे, २०१६ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

योजनेच्या इतर अनुषंगिक अटी व शर्ती यापूर्वी मंजूर केल्यानुसार राहतील. तसेच यापूर्वी राज्य शासनाने रु.२२०९ कोटी कर्ज पात्र रक्कम आणि रु. ४६८ कोटी व्याज अनुदान भार मंजूर केला आहे, त्याच मर्यादेत सदर मंजूरी देण्यात येत आहे. शासन निर्णय दि.३०.७.२०१५ च्या सॉफ्टलोन योजनेनुसार पात्र १४८ कारखान्यांसाठी ४ वर्षाचे व्याज अनुदान यापूर्वी मंजूर केल्यानुसार राज्य शासनाकडून देण्यात येईल. केंद्र शासनाच्या योजनेत लाभ मिळाला नसला, तरी या वाढीव मुदतीत राज्य शासनाकडून ४ वर्षाचे देय व्याज अनुदान देण्यात येईल. तसेच उर्वरित दि.५.९.२०१५ (२२ कारखाने) आणि दि.९.१२.२०१५ (६ कारखाने) च्या शासन निर्णयानुसारच्या योजनेमधील पात्र असे एकूण २८ कारखान्यांसाठी ५ वर्षाचे व्याज अनुदान यापूर्वी मंजूर केल्यानुसार राज्य शासनाकडून देण्यात येईल.

(२) **कर्ज पात्र रकमेनुसार, एफआरपीची रक्कम शेतक-यांच्या खात्यावर वर्ग केल्यानंतरची उर्वरित रक्कम कारखान्याच्या खात्यावर वर्ग करणे:-** यापूर्वीच्या ३ सॉफ्टलोन योजना केवळ शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी लागू करण्यात आल्या आहेत. आता केंद्र शासनाची अधिसूचना दि. १८/८/२०१५ नुसार शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा केल्यानंतर कर्ज पात्र रकमेतील उर्वरित रक्कम कारखान्यांच्या खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

यासाठी शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१५ आणि दिनांक ०९.१२.२०१५ मधील कर्ज पात्र रक्कम ठरवतानाच्या अटीतील प्रलंबित उस देयक (-) उचल न केलेले तारण कर्ज हा भाग वगळण्यात येत आहे. संबंधित शासन निर्णयामध्ये नमूद कालावधीतील पांढऱ्या साखरेच्या उत्पादनाच्या ११% साखर साठ्याच्या रु.२४०००/- प्रती मे. टन प्रमाणे होणारी रक्कम कर्ज पात्र राहील, त्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर तीनही योजनांतर्गत रु.२२०९ कोटी कर्ज पात्र मर्यादा तसेच राज्य शासनाने दयावयाच्या व्याज अनुदानापोटी रु. ४६८कोटी वित्तीय भार मंजूर करण्यात आला आहे. त्याच मर्यादेत सदर मान्यता देण्यात येत आहे. कर्ज मंजूर व वितरणाची मुदत ३१ मे, २०१६ पर्यंत राहील.

(३) **कच्च्या साखरेच्या उत्पादनाचा कर्ज पात्र मर्यादा ठरविणेसाठी विचार करणे:-** जे साखर कारखाने कच्च्या साखरेच्या उत्पादनावर निर्यात अनुदान अथवा सॉफ्टलोनसाठी पात्र ठरलेले नाही, अशा उत्पादित कच्च्या साखरेच्या ११% साखर उत्पादनानुसार रु. २४००० प्रती मे.टन प्रमाणे ४१ साखर कारखान्यांना रु.१७४.५१ कोटी कर्ज पात्र रकमेवर सरळ व्याजाच्या १०% प्रमाणे अथवा बँकेकडून आकारण्यात येणारा व्याज दर यापैकी जे कमी असेल, त्यानुसार जास्तीत जास्त ५ वर्षापर्यत व्याज अनुदान देण्यास “विशेष

बाब" म्हणून मान्यता देण्यात येत आहे. त्यापोटी रु. ५२.३५ कोटी इतका वित्तीय भार मंजूर करण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाची अधिसूचना दि. १८/८/२०१५ नुसार शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा केल्यानंतर कर्ज पात्र रकमेतील उर्वरित रक्कम कारखान्यांच्या खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. कर्ज मंजूरी व वितरणाची मुदत ३१ मे, २०१६ पर्यंत राहील. योजनेच्या इतर अनुषंगिक अटी व शर्ती यापूर्वीच्या सॉफ्टलोन योजनेप्रमाणे राहतील.

०२. सदर योजनेच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहेत:-

**अ) शासन निर्णय दिनांक ३०/०७/२०१५ दिनांक ०५/०९/२०१५ आणि दिनांक ०९/१२/२०१५ नुसार सॉफ्ट लोन योजना- कर्ज मंजूरी व वितरणासाठी मुदतवाढ आणि शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम अदा केल्यावर उर्वरीत कर्जपात्र रक्कम कारखान्यांच्या खात्यावर वर्ग करणे:-**

(१)ऊस उत्पादक शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम देता यावी म्हणून शासन निर्णय दि.३०/७/२०१५, दि.५/९/२०१५ व दि.९/१२/२०१५ अन्वये एकूण १७६ साखर कारखान्यांसाठी (प्रपत्र-१) लागू केलेल्या सॉफ्ट लोन योजनेअंतर्गत कर्ज मंजूरी व वितरणाची मुदत दि. ३१ मे, २०१६ पर्यंत वाढविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(२) यापूर्वीच्या सॉफ्टलोन योजना केवळ शेतकऱ्यांच्या एफआरपीची रक्कम अदा करण्यासाठी लागू करण्यात आल्या आहेत. आता केंद्र शासनाची अधिसूचना दि. १८/८/२०१५ नुसार शेतक-यांच्या एफआरपीची रक्कम अदा केल्यानंतर कर्ज पात्र रकमेतील उर्वरित रक्कम कारखान्यांच्या खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(३) शासन निर्णय दिनांक ३०.०७.२०१५ मधील १४८ कारखान्यांच्या कर्जावरील पहिल्या वर्षाचे व्याज अनुदान केंद्र शासनाने देण्याची तरतूद अधिसूचना दिनांक २३.०६.२०१५ नुसार आहे. या कारखान्यांनी विहीत कालमर्यादेत कर्ज प्रस्ताव दाखल करुन बँकांकडून कर्ज मंजूर करुन घेणे आवश्यक होते. जेणे करुन त्यांना केंद्र शासनाकडून मिळणारे पहिल्या वर्षाचे व्याज अनुदान मिळू शकले असते. त्यामुळे या वाढीव मुदतीत या कारखान्यांना आता केंद्र शासनाच्या योजनेत लाभ मिळाला नसला तरी राज्य शासनाकडून ४ वर्षाचे देय व्याज अनुदान देण्यात येणार आहे. राज्य शासनातर्फे केवळ ४ वर्षाचेच व्याज अनुदान यापूर्वीच्या मंजूर वित्तीय भारातून देण्यात यावे.

(४) शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१५ नुसार (२२ कारखाने) आणि दिनांक ०९.१२.२०१५ नुसार (६ कारखाने) साखर कारखान्यांच्या कर्जपात्र रकमेवरील एकूण ५ वर्षाच्या व्याज अनुदानाचा भार देखील यापूर्वीच मंजूर केलेला आहे. त्यामुळे कोणताही अतिरिक्त वित्तीय भार नाही. या २८ कारखान्यांना सद्यस्थितीत रु.३४७.३८ कोटी प्रलंबित असलेल्या एफआरपीपैकी काही रक्कम शेतक-यांना देता येईल.

(५) योजनेच्या इतर अनुषंगिक अटी व शर्ती यापूर्वी मंजूर केल्यानुसार राहतील.

(६) यापूर्वी या योजनांतर्गत रु.२२०९ कोटी कर्ज पात्र मर्यादा तसेच राज्य शासनाने दयावयाच्या व्याज अनुदानापोटी रु. ४६८कोटी वित्तीय भार मंजूर करण्यात आला आहे. त्याच मर्यादेत सदर मान्यता देण्यात येत आहे. कर्ज मंजूर व वितरणाची मुदत ३१ मे, २०१६ पर्यंत राहील.

**ब) साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या कच्च्या साखर उत्पादनाचाही कर्ज पात्र मर्यादा ठरविणेसाठी विचार करणे:-**

१) ज्या साखर कारखान्याने दिनांक ३१.०८.२०१५ अखेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना एफआरपीची ५०% रक्कम दिली आहे आणि कच्च्या साखरेचे उत्पादन निर्यात अनुदान अथवा सॉफ्टलोनसाठी पात्र ठरले नाही, अशा उत्पादनाचे आधारे पात्र कर्ज मर्यादेनुसार त्यांना राज्य शासनाच्या निधीतून व्याज अनुदान देणेसाठीची सदर योजना लागू करण्यात यावी.

२) या साखर कारखान्यांच्या हंगाम २०१३-१४ मधील कच्च्या साखर उत्पादनाच्या ११% साखर साठ्याची किंमत आधारभूत धरण्यात यावी. त्यानुसार ४१ साखर कारखाने(प्रपत्र-२) प्रति टन रु.२४००० /-

याप्रमाणे जास्तीत जास्त अंदाजे रु.१७४.५१कोटी इतक्या कर्ज रकमेस पात्र होत आहेत. सरळ व्याजाच्या १०% किंवा बँकेकडून आकारण्यात येणा-या व्याजदरामधील जो दर कमी असेल, त्यानुसार जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत राज्य शासन व्याज अनुदान देईल. सदर व्याज अनुदान वार्षिक स्वरुपात कारखान्यांना प्राप्त होईल. या कारखान्यांनी स्वत:हून बँकेस संपर्क साधून कर्ज मंजूर करुन घेणे आवश्यक आहे. या कारखान्यांना देय कर्जापोटीचे ५ वर्षाचे व्याज अनुदान म्हणून राज्य शासनाकडून देण्यात यावे. यापोटी अंदाजे एकूण रु.५२.३५कोटी इतका वित्तीय भार मंजूर करण्यात येत आहे.

३) गाळप हंगाम २०१३-१४ मधील एफ.आर.पी. प्रमाणे एकूण देय ऊस किंमतीच्या ५०% रक्कम दि.३१.०८.२०१५ अखेर ज्या कारखान्यांनी अदा केलेली आहे, अशा कारखान्यांचे प्रस्ताव संबंधित कारखान्यांनी निवडलेल्या बँकांनी स्विकृत करावयाचे आहेत. याबाबत साखर आयुक्तालयाकडील प्रमाणपत्र तसेच संबंधित केंद्रीय अबकारी विभागाकडून मिळालेले प्रमाणपत्र कारखान्याने बँकेस सादर करावयाचे आहे.

४) शेतक-यांना द्यावयाच्या प्रलंबित ऊस किंमतीच्या प्रमाणात(Pro-rata) कारखान्यांना बँका कर्ज मंजूर करतील.

५) जे कारखाने त्यांच्या मुद्दलाची रक्कम वेळच्यावेळी भरणार नाहीत, त्यांना सदर योजनेतून तात्काळ वगळण्यात येईल आणि हप्ते थकवल्यापासूनचे राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान देण्यात येणार नाही.

६) कर्ज मंजूरीची प्रक्रिया व इतर बाबींची पुर्तता झाल्यावर संबंधित बँकेने कारखान्यांकडून एफ.आर.पी. प्रमाणे शेतक-यांना अदा करावयाची रक्कम व शेतक-यांचे बँक खाते याबाबत सर्व माहिती घेऊन संबंधित कारखान्याच्या वतीने शेतक-यांचे खात्यावर सदरची रक्कम जमा करावयाची आहे. त्यानंतर जर काही रक्कम उरली तर ती केंद्र शासनाच्या दिनांक १८.०८.२०१५ रोजीच्या अधिसूचनेनुसार कारखान्याच्या खात्यावर जमा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. मंजूर कर्ज पात्र मर्यादेत उचल केलेल्या रकमेवर व्याज अनुदान देण्यात येईल.

७) कारखान्याने सदर कर्जाबाबत विनियोग दाखला सादर केला, तरच राज्य शासनाकडून देय व्याज अनुदान प्राप्त होईल. कारखाना विनियोग दाखला सादर करु न शकल्यास, जो पर्यंत विनियोग दाखला सादर केला जात नाही, तोपर्यंत व्याज अनुदान मिळण्यास कारखाना अपात्र ठरेल.

८) बँकांमार्फत दि.३१/०५/२०१६ पर्यंत मंजूर व वितरीत केलेले कर्ज व्याज अनुदानास पात्र ठरतील.

९) ५ वर्षाच्या कालावधीपूर्वी कारखान्यास कर्जाची संपूर्ण परतफेड करावयाची असल्यास, याबाबत संबंधित बँक निर्णय घेईल. तसेच कर्ज परतफेडीच्या कालावधीच्या प्रमाणात राज्य शासनाकडून प्राप्त होणारे व्याज अनुदान देण्यात येईल.

१०) सदर कर्जाचा विनियोग करुन प्रलंबित एफआरपी पूर्णपणे अदा केली असल्याबाबत कारखान्यांनी साखर आयुक्त यांनी प्रमाणित केलेला विनियोग दाखला सादर करावयाचा आहे. सदर दाखला सादर न करु शकणारे कारखाने व्याज अनुदानास पात्र होणार नाहीत.

११) कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही याची दक्षता साखर आयुक्त यांनी घ्यावी.

१२) सदर निर्णयानुसार योजनेच्या राज्यातील अंमलबजावणीच्या कार्यपध्दतीबाबत सविस्तर आदेश साखर आयुक्त यांनी आवश्यकतेनुरुप निर्गमित करावेत.

१३) राज्य मंत्रीमंडळाच्या निर्णयानुसार यापूर्वीच्या तिनही सॉफ्टलोन योजनेतील बदल केलेल्या तरतूदी विचारात घेऊन यापूर्वी शासन निर्णय दिनांक ३०.०७.२०१५, दिनांक ०५.०९.२०१५ आणि दिनांक ०९.१२.२०१५ अन्वये निर्गमित केल्यानुसार इतर उर्वरित अनुषंगिक अटी व शर्ती लागू होतील.

१४) ज्या साखर कारखान्यांनी एफआरपी अदायगीसाठी स्वत:चे साधन असतानाही एफआरपी दिली नसल्यास, त्यांचे विरुध्द साखर आयुक्तांनी नियमानुसार कारवाई करावी.

१५) उपरोक्त बाबीवरील होणारा खर्च लेखाशीर्ष-२४२५, सहकारी, (०३)सहकारी साखर कारखाने (०३) (०२) सहकारी साखर कारखान्यांना सहायक अनुदान, ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) (२४२५०९८९) या लेखाशिर्षाखाली सन २०१६-१७ ते सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात उपलब्ध होणा-या संबंधित वर्षाच्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

०३. सदर शासन निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या दिनांक ०६.०४.२०१६ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयास अनुसरुन आणि वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.६२/१६ व्यय-२, दिनांक २३.०३.२०१६ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

०४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१६०४२११७०९५२२६०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Balasaheb Ishwar Sawant

Digitally signed by Balasaheb Ishwar Sawant
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Balasaheb Ishwar Sawant
Date: 2016.04.22 16:56:44 +05'30'

**(बा.ई.सावंत)**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.राज्यपाल महोदय यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
४) मा.राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय,मुंबई
७) प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा-१)/(लेखा व अनुज्ञेयता-१) महाराष्ट्र राज्य, मुंबई
८) प्रधान महालेखाकार ( लेखापरिक्षा-२)/(लेखा व अनुज्ञेयता-२) महाराष्ट्र राज्य, नागपूर
९) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) साखर आयुक्त, महाराष्ट्र राज्य, पुणे.
११) सर्व जिल्हाधिकारी.
१२) सर्व विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था.
१३) सर्व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व साखर कारखान्यांच्या निदर्शनास आणावेत.
१४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व).
१५) वित्त विभाग व्यय-२/अर्थसंकल्प-३/अर्थसंकल्प-१३, मंत्रालय, मुंबई.
१६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१७) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
१८) अध्यक्ष/कार्यकारी संचालक, महाराष्ट्र राज्य, सहकारी बँक मर्या., मुंबई.
१९) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ म., नरीमन पॉईंट-मुंबई.
२०) कार्यासन क्रमांक १६-स/१७-स/२२-स/२५-स,सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय, मुंबई
२१) ३-स,संग्रहार्थ.

शासन निर्णय क्रमांक ससाका-२०१६/प्र.क्र.३४५/३-स, दिनांक २१.०४.२०१६ चे सहपत्र. जोडपत्र-१सॉफ्ट लोन योजना २०१५ अंतर्गत राज्यातील पात्र साखर कारखाने व त्यांचे कर्ज मर्यादेबाबत तपशिल (रु. लाखात)

| अ.क्र. | कारखान्याचे नांव | प्रकार | सॉफ्ट लोनयोजनेंतर्गत पांढ-या साखरेनुसार पात्र कर्ज मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| अ) केंद्र शासन अधिसूचना दि.२३/०६/२०१५ व शासन निर्णय दि.३०/०७/२०१५ नुसार पात्र साखर कारखाने (१४८) | | | |
| १ | आजरा सह.सा.का. लि., गवसे ता. आजरा, जि. कोल्हापूर | सहकारी | ११७२.२५ |
| २ | भोगावती सह.सा.का. लि., परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर | सहकारी | १८६१.४० |
| ३ | श्री छत्रपती राजाराम सह.सा.का. लि.,कसबा बावडा ता. करवीर, जि. कोल्हापूर | सहकारी | १३४४.०५ |
| ४ | श्री छत्रपती शाहू सह.सा.का. लि., कागल,ता. कागल, जि. कोल्हापूर | सहकारी | २५११.१७ |
| ५ | श्री दत्त शेतकरी शिरोळ सह.सा.का. लि.,दत्तनगर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | सहकारी | ४०१२.०१ |
| ६ | श्री दुधगंगा वेदगंगा सह.सा.का. लि., बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर | सहकारी | २०७०.०२ |
| ७ | आ. नलवडे गडहिंग्लज (ब्रिक्स फॅसिलिटीज) सह.सा.का. लि., हरळी, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर | सहकारी | ८४१.२४ |
| ८ | जवाहर शेतकरी सह.सा.का. लि., हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | सहकारी | ४७४४.९९ |
| ९ | स. मंडलिक कागल तालुका सह.सा.का. लि., हमीदवाडा,ता. कागल जि. कोल्हापूर | सहकारी | १७१४.०२ |
| १० | कुंभी कासारी सह. सा. का. लि.,कुडित्रे, ता. करवीर, जि. कोल्हापूर | सहकारी | १८३९.९० |
| ११ | दे. र. कुंभार पंचगंगा (रेणुका शुगर्स) सह. सा. का. लि., गंगानगर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | सहकारी | २५४१.४० |
| १२ | शरद सह.सा.का. लि.,नरंदे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | सहकारी | २०५६.५६ |
| १३ | श्री तात्यासाहेब कोरे वारणा सह.सा.का. लि.,वारणानगर , ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | सहकारी | ४७११.६१ |
| १४ | उदयसिंगराव गायकवाड सह.सा.का. लि., बांबवडे,ता. शाहूवाडी, जि. कोल्हापूर | सहकारी | ३००.२६ |
| १५ | प. डॉ. डी.वाय. पाटील सह.सा.का. लि.,ज्ञानशांतीनगर, ता. गगनबावडा, जि. कोल्हापूर | सहकारी | १२५७.६८ |
| १६ | दालमिया भारत शुगर- दत्त आसुर्ले युनिट लि.,आसुर्ले-पोर्ले, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | खाजगी | १४०६.०० |
| १७ | श्री गुरुदत्त शुगर लि.,टाकळीवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | खाजगी | २३३५.२९ |
| १८ | इको केन शुगर एनर्जी लि., म्हाळुंगी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | खाजगी | ७९५.७० |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | ओलम ॲग्रो इंडिया (हेमरस इंडस्ट्रिज) लि., राजगोळी खु., ता. चंदगड, जि. कोल्हापूर | खाजगी | १७४५.७२ |
| २० | क्रांतीसिंह ना. नायकवडी हु. कि. अहीर सह.सा.का. लि.,वाळवा, ता. वाळवा जि. सांगली | सहकारी | २३३१.९८ |
| २१ | रा.वि.डफळे (रा.बा. पाटील) सह.सा.का. लि.,तिप्पेहळ्ळी .ता. जत . जि. सांगली | सहकारी | ८२०.७६ |
| २२ | श्री महांकाली सह.सा.का. लि.,राजारामबापू नगर. ता. कवठेमहंकाळ, जि. सांगली | सहकारी | ८२७.६४ |
| २३ | रा. बा. पाटील सह.सा.का. लि.,साखराळे, ता. वाळवा, जि. सांगली | सहकारी | ३१६८.३३ |
| २४ | रा. बा. पाटील सह.सा.का. लि.,वाटेगांव, ता. वाळवा, जि. सांगली | सहकारी | १६८२.४७ |
| २५ | सोनहिरा सह.सा.का. लि.,वांगी, ता. कडेगांव, जि. सांगली | सहकारी | १९२८.९२ |
| २६ | वसंतदादा शेतकरी सह.सा.का. लि., माधवनगर रोड,ता. मिरज, जि. सांगली | सहकारी | १३३७.९५ |
| २७ | विश्वासराव नाईक सह.सा.का. लि.,चिखली, ता. शिराळा, जि. सांगली | सहकारी | १५२९.३६ |
| २८ | क्रांतीअग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड सह.सा.का. लि., कुंडल, ता. पलुस, जि. सांगली | सहकारी | २५२६.७४ |
| २९ | मोहनराव शिंदे सह.सा.का. लि., अरग, ता. मिरज, जि. सांगली | सहकारी | १५११.९९ |
| ३० | सर्वोदय (रा.बा.पाटील) सह.सा.का. लि.,कारंदवाडी, ता. वाळवा, जि. सांगली | सहकारी | १४९६.२२ |
| ३१ | यशवंत शुगर्स लि.,नागेवाडी, ता. खानापूर, जि. सांगली | खाजगी | ५२४.६२ |
| ३२ | केन ॲग्रो एनर्जी इंडिया लि., रायगांव,ता. कडेगांव, जि. सांगली | खाजगी | १४६३.३५ |
| ३३ | उदगिर शुगर ॲन्ड पॉवर लि.,बामणी पारे ता. खानापूर, जि. सांगली | खाजगी | १२९८.६८ |
| ३४ | सदगुरू श्री श्री साखर कारखाना लि.,राजेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली | खाजगी | ५७३.३३ |
| ३५ | अजिंक्यतारा सह.सा.का. लि.,शेंद्रे, ता. जि. सातारा | सहकारी | १९८६.८९ |
| ३६ | लो.बा. देसाई सह.सा.का. लि., दौलतनगर-मरळी, ता. पाटण, जि. सातारा | सहकारी | ८९२.७१ |
| ३७ | किसनवीर सातारा सह.सा.का. लि.,भुईंज, ता. वाई, जि. सातारा | सहकारी | २४५४.४१ |
| ३८ | य. मो. कृष्णा सह.सा.का. लि., रेठरे बु., ता. कराड, जि. सातारा | सहकारी | ३५०९.४८ |
| ३९ | सह्याद्री सह.सा.का. लि., यशवंतनगर, ता. कराड, जि. सातारा | सहकारी | ४२१६.८६ |
| ४० | श्रीराम जवाहर शेतकरी सहकारी साखर उद्योग लि., ता. फलटण, जि. सातारा | सहकारी | ११०२.८२ |
| ४१ | किसनवीर प्रतापगड साखर उद्योग लि.,सोनगांव, ता. जावळी, जि. सातारा | सहकारी | १२०९.५२ |
| ४२ | जरंडेश्वर शुगर मिल्स लि., चिमणगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा | खाजगी | १४९५.५६ |
| ४३ | न्यु फलटण शुगर लि.,साखरवाडी, ता. फलटण, जि. सातारा | खाजगी | ८५०.७३ |
| ४४ | जयवंत शुगर लि., पाली, ता. कराड, जि. सातारा | खाजगी | १२१८.६२ |
| ४५ | भीमा सह. सा. का. लि.,पाट्स, ता. दौंड, जि. पुणे | सहकारी | १८२७.०१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४६ | भीमाशंकर सह.सा.का. लि., पारगांव-अवसरी, ता. आंबेगांव, जि. पुणे | सहकारी | २१६६.७३ |
| ४७ | श्री छत्रपती सह.सा.का. लि., भवानीनगरता. इंदापूर, जि. पुणे | सहकारी | १८००.८७ |
| ४८ | रा. पवार घोडगंगा सह.सा.का. लि., न्हावरे, ता. शिरुर, जि. पुणे | सहकारी | १६४९.१० |
| ४९ | कर्मयोगी शं. पाटील सह.सा.का. लि., म्हात्माफुलेनगर, बिजवडी,ता. इंदापूर, जि. पुणे | सहकारी | २६२५.४८ |
| ५० | दि माळेगांव सह.सा.का. लि.,शिवनगर, ता. बारामती, जि पुणे | सहकारी | २६९०.१६ |
| ५१ | निरा भीमा सह.सा.का. लि., शहाजीनगर, ता.इंदापूर जि. पुणे | सहकारी | ९८१.०४ |
| ५२ | राजगड सह.सा.का. लि.,अनंतनगर- निगडे, ता.भोर, जि. पुणे | सहकारी | ५६९.३७ |
| ५३ | संत तुकाराम सह.सा.का. लि.,कासारसाई-दारुंब्रे, ता.मुळशी, जि. पुणे | सहकारी | १४७०.८१ |
| ५४ | सोमेश्वर सह.सा.का. लि.,सोमेश्वरनगर, ता. बारामती, जि. पुणे | सहकारी | २७७२.६६ |
| ५५ | श्री विघ्नहर सह.सा.का. लि.,निवृत्तीनगर, ता. जुन्नर, जि.पुणे | सहकारी | २९७३.१३ |
| ५६ | श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि., पाटेठाण-राहू, ता.दौंड, जि.पुणे | खाजगी | १०८९.०० |
| ५७ | अनुराज शुगर्स लि., यवत, ता. दौंड, जि.पुणे | खाजगी | ८७४.६३ |
| ५८ | बारामती ॲग्रो यु. १ लि., शेटफळगडे, ता. इंदापूर, जि.पुणे | खाजगी | १७७७.५१ |
| ५९ | दौंड शुगर्स लि.,आलेगांव, ता. दौंड, जि. पुणे | खाजगी | १९८०.०० |
| ६० | व्यंकटेशकृपा शुगर मिल्स लि.,जातेगांव, ता. शिरुर, जि. पुणे | खाजगी | ९०५.७८ |
| ६१ | श्री आदिनाथ सह.सा.का. लि., आदिनाथनगर, ता. करमाळा, जि. सोलापूर | सहकारी | ३५७.२२ |
| ६२ | भीमा सह.सा.का. लि.,टाकळी-सिकंदर, ता. मोहोळ, जि. सोलापूर | सहकारी | ११७९.०२ |
| ६३ | स.शि. वसंतराव काळे सह.सा.का. लि.,चंद्रभागानगर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | सहकारी | ८७३.९७ |
| ६४ | श्री पांडुरंग सह.सा.का. लि.,श्रीपूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | सहकारी | २७३५.६३ |
| ६५ | श्री सिध्देश्वर सह.सा.का. लि.,कुमठे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | सहकारी | २३५४.४८ |
| ६६ | श्री संत दामाजी सह. सा. का. लि., ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | सहकारी | ८६९.६२ |
| ६७ | श्री शंकर सह.सा.का. लि.,सदाशिवनगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर | सहकारी | ८६०.८८ |
| ६८ | स.म. शंकरराव मोहिते-पाटील सह.सा.का. लि.,अकलुज, ता. माळशिरस, जि. सोलापूर | सहकारी | २८२३.४८ |
| ६९ | श्री विठ्ठल सह.सा.का. लि.,गुरसाळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | सहकारी | १७७०.२२ |
| ७० | श्री विठ्ठलराव शिंदे सह.सा.का. लि.,पिंपळानेर, ता. माढा, जि. सोलापूर | सहकारी | ३१४७.६७ |
| ७१ | श्री मकाई सह.सा.का. लि., ता. करमाळा, जि. सोलापूर | सहकारी | ४२५.९६ |
| ७२ | संत कुर्मादास सह.सा.का. लि., ता. माढा, जि. सोलापूर | सहकारी | ४९.५७ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७३ | सासवड माळी शुगर फॅक्टरी लि., ता. माळशिरस, जि. सोलापूर | खाजगी | ८७४.१० |
| ७४ | लोकमंगल ॲग्रो लि., ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | खाजगी | ७८२.८७ |
| ७५ | लोकमंगल शुगर लि., ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | खाजगी | १७०१.२२ |
| ७६ | विठ्ठल कार्पोरेशन लि., ता. माढा, जि. सोलापूर | खाजगी | ११०६.९५ |
| ७७ | सिध्दनाथ शुगर लि.,तीर्हे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर | खाजगी | ८२१.९६ |
| ७८ | जकराया शुगर्स लि., ता. मोहोळ, जि. सोलापूर | खाजगी | ८२६.५८ |
| ७९ | इंद्रेश्वर शुगर मिल्स लि., ता. बार्शी, जि. सोलापूर | खाजगी | ७६२.१७ |
| ८० | भैरवनाथ शुगर वर्क्स लि.,विहाळा यु. २, ता. करमाळा, जि. सोलापूर | खाजगी | ८०७.५८ |
| ८१ | मातोश्री लक्ष्मी शुगर्स लि., ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | खाजगी | १५१८.०० |
| ८२ | विजय शुगर्स लि., ता. पंढरपुर, जि.सोलापूर | खाजगी | ४१३.११ |
| ८३ | सिताराम महाराज शुगर लि., ता. पंढरपूर, जि. सोलापूर | खाजगी | ३३८.७१ |
| ८४ | शेतकरी साखर कारखाना (चांदापूरी) लि., माळशिरस, जि. सोलापूर | खाजगी | ४४८.१४ |
| ८५ | फॅबटेक शुगर लि., ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | खाजगी | ११७८.८९ |
| ८६ | अगस्ति सह.सा.का. लि., ता. अकोले, जि. अहमदनगर | सहकारी | ११६४.६४ |
| ८७ | अशोक सह.सा.का. लि., ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर | सहकारी | १५६०.८३ |
| ८८ | ज्ञानेश्वर सह.सा.का. लि., ता. नेवासा, जि. अहमदनगर | सहकारी | १६९४.८८ |
| ८९ | प.डॉ. वि.वि.पाटील सह.सा.का. लि., प्रवरानगर, ता. राहाता, जि. अहमदमगर | सहकारी | २८९१.८६ |
| ९० | कर्मवीर शंकररावजी काळे सह.सा.का. लि., ता. कोपरगांव, जि. अहमदनगर | सहकारी | १५८४.२६ |
| ९१ | मुळा सह.सा.का. लि., ता. नेवासा, जि. अहमदनगर | सहकारी | २०८४.६८ |
| ९२ | स.म. भाऊसाहेब थोरात सह.सा.का. लि., ता. संगमनेर, जि. अहमदनगर | सहकारी | २८९३.९९ |
| ९३ | संजीवनी (टाकळी) सह.सा.का. लि. ता. कोपरगांव, जि. अहमदनगर | सहकारी | १८५६.१८ |
| ९४ | स.म. शिवाजीराव नागवडे सह.सा.का. लि., ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | सहकारी | १४०४.८९ |
| ९५ | श्री वृध्देश्वर सह.सा.का. लि., ता. पाथर्डी, जि. अहमदनगर | सहकारी | ८०२.५७ |
| ९६ | कुकडी सह.सा.का. लि., ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | सहकारी | ११७५.२६ |
| ९७ | जगदंबा शुगर्स ॲन्ड ॲग्रो लि.,राशीण, ता. कर्जत जि. अहमदनगर | खाजगी | २५३९.६८ |
| ९८ | गंगामाई इंडस्ट्रिज ॲन्ड कन्स्ट्रकश्न लि., ता. शेवगांव, जि. अहमदनगर | खाजगी | १२५६.९० |
| ९९ | प्रसाद शुगर ॲन्ड अलाईड ॲग्रो प्रोडक्ट्स लि.,वांबोरी, ता. | खाजगी | ६२१.१९ |
| १०० | जयश्रीराम शुगर ॲन्ड ॲग्रो लि., ता. जामखेड, जि. अहमदनगर | खाजगी | ४९.६१ |
| १०१ | के.के.वाघ सह.सा.का. लि., काकासाहेबनगर, ता.दिंडोरी जि.नाशिक | सहकारी | ५६९.७८ |
| १०२ | कादवा सह.सा.का.लि., मातेरेवाडी राजारामनगर, ता.दिंडोरी, जि.नाशिक | सहकारी | ६७४.१७ |
| १०३ | आर्मस्ट्राँग इन्फ्रास्ट्रक्चर्स प्रा.लि. दाभाडी ता.मालेगांव जि.नाशिक | खाजगी | ३८१.४७ |
| १०४ | व्दारकाधीश सह.सा.का. लि., शेवरे, ता.सटाणा, जि.नाशिक | सहकारी | ११४८.९० |
| १०५ | सातपुडा तापी परीसर सह.सा.का.लि. पुरुषोत्तमनगर, ता. शहादा, जि.नंदुरबार | सहकारी | ११११.५१ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०६ | आदिवासी विकास सह.सा.का.लि., ता.नवापूर जि.नंदुरबार | सहकारी | ३११.१९ |
| १०७ | ॲस्टोरिया (पुष्पदंतेश्वर) प्रा.लि., जि.नंदुरबार | खाजगी | १०४८.०३ |
| १०८ | मधुकर सह.सा.का.लि., जिवरामनगर, ता.यावल, जि.जळगांव | सहकारी | ९१७.४७ |
| १०९ | सिद्धेश्वर सह.सा.का.लि., माणिकनगर, ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद | सहकारी | १२०.२९ |
| ११० | बारामती ॲग्रो प्रा.लि., महात्माफुलेनगर, ता.कन्नड, जि.औरंगाबाद | खाजगी | ४९१.०४ |
| १११ | संभाजीराजे शुगर्स लि.,चित्तेपिंपळगांव, ता. जि.औरंगाबाद | खाजगी | ४३९.८२ |
| ११२ | मुक्तेश्वर शुगर्स लि.,धामोरी (बु.) पो.शेंदुरवाडा, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद. | खाजगी | २६९.८१ |
| ११३ | रामेश्वर सह.सा.का.लि., सिपोराबाजार, ता.भोकरदन, जि.जालना | सहकारी | ३५१.१२ |
| ११४ | समर्थ सह.सा.का.लि., अंकुशनगर, ता.अंबड, जि.जालना | सहकारी | १२६४.५६ |
| ११५ | समृद्धी शुगर्स लि.,रेणुकानगर, ता. घनसांगवी, जि.जालना | खाजगी | २५५.६८ |
| ११६ | वैद्यनाथ सह.सा.का.लि.,पांगरी, ता.परळी वैद्यनाथ जि.बीड | सहकारी | १३१३.२७ |
| ११७ | माजलगांव सह.सा.का.लि., सुंदरनगर, ता.माजलगांव, जि.बीड | सहकारी | ११८६.८१ |
| ११८ | एन.एस.एल.शुगर्स जय महेश शुगर्स लि., पवारवाडी, ता.माजलगांव, जि.बीड | सहकारी | ७४६.२० |
| ११९ | येडेश्वरी ॲग्रो लि., पवनसुतनगर, आनंदगांव, ता.केज, जि.बीड | खाजगी | ८०२.१६ |
| १२० | योगेश्वरी शुगर्स लि.,लिंबा, ता. पाथरी, जि.परभणी | खाजगी | ५२०.२१ |
| १२१ | गंगाखेड शुगर्स लि., विजयनगर,माखणी, ता.गंगाखेड, जि.परभणी | खाजगी | १४५०.६८ |
| १२२ | मराठवाड भाऊराव चव्हाण सह.सा.का. लि., यु.नं.२ शिवाजीनगर, डोंगरकडा, ता.कळमनुरी, जि. हिंगोली | सहकारी | ७६६.८७ |
| १२३ | पुर्णा सह.सा.का.लि., वसमतनगर ता.वसमतनगर, जि.हिंगोली. | सहकारी | ११०६.१६ |
| १२४ | बाराशिव हनुमान-पुर्णा सह.सा.का. लि.,जवळाबाजार, ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली. | सहकारी | ६५३.०८ |
| १२५ | भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना लि., यु.१, लक्ष्मीनगर देवगांव, ता.अर्धापूर, जि.नांदेड | सहकारी | १७३६.०६ |
| १२६ | भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना(शंकर) लि., यु.३,वाघलवाडा, ता.उमरी, जि.नांदेड | सहकारी | ५८५.०२ |
| १२७ | भाऊराव चव्हाण (हु.ज.पाटील) सहकारी साखर कारखाना लि.,हादगांव, यु.४, जि.नांदेड | सहकारी | ८८५.५२ |
| १२८ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर सह.सा.का.लि.,केशेगांव, ता.जि.उस्मानाबाद. | सहकारी | ११४७.२६ |
| १२९ | श्री विठ्ठलसाई सह.सा.का. लि., राजीवगांधीनगर, ता.उमरगा, जि.उस्मानाबाद | सहकारी | ११६३.३२ |
| १३० | शिवशक्ती शेतकरी सह.सा.का. लि. वाशी, ता.वाशी, जि.उस्मानाबाद | सहकारी | २७५.२२ |
| १३१ | नॅचरल शुगर्स ॲड अलाईड साईनगर, रांजणी ता.कळंब जि.उस्म्नाबाद. | खाजगी | १२४१.५९ |
| १३२ | शंभु महादेव शुगर अलाईड लि., हावरगांव, ता.कळंब, जि.उस्मानाबाद | खाजगी | ६०८.७८ |
| १३३ | भिमाशंकर शुगर्स लि., पारगांव, ता.वाशी, जि. उस्मानाबाद | खाजगी | ४५.६२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १३४ | भैरवनाथ शुगर्स लि., शिवाजीनगर, पो.सोनारी, ता.परांडा जि.उस्मानाबाद | खाजगी | ५६१.५३ |
| १३५ | लोकमंगल माऊली शुगर्स लि., लोहारा जि.उस्मानाबाद | खाजगी | १२८८.५६ |
| १३६ | मांजरा सह.सा. का.लि., विलासनगर, ता.लातूर. जि.लातूर | सहकारी | १३७९.५३ |
| १३७ | विकास सह.सा.का. लि. वैशालीनगर, निवळी. ता.जि. लातूर | सहकारी | १३७७.६३ |
| १३८ | रेणा सहकारी साखर कारखाना लि., दिलीपनगर. निवाडा. ता.रेणापूर. जि.लातूर | सहकारी | १०३२.६४ |
| १३९ | सिद्धी शुगर्स, लि., बालाघाट, महेशनगर, उजना. ता.अहमदपूर. जि.लातूर. | खाजगी | १४१८.६० |
| १४० | पनंगेश्वर शुगर्स मिल्स लि., पानगांव, ता.रेनापूर, जि.लातूर. | खाजगी | ६५२.६१ |
| १४१ | साईबाबा शुगर्स लि., शिवनी बु., ता. औसा. जि.लातूर | खाजगी | ३७२.२४ |
| १४२ | जागृती शुगर्स लि.,तळेगांव, ता. देवणी, जि.लातूर | खाजगी | १२१५.६४ |
| १४३ | वसंत सह.सा.का. लि., वसंतनगर, पोफाळी, ता.उमरखेड, जि.यवतमाळ. | सहकारी | ६५८.३० |
| १४४ | डेक्कन शुगर्स प्रा.लि., देवराव पाटीलनगर, ता.मंगरुळ, जि.यवतमाळ. | खाजगी | ४३९.०५ |
| १४५ | महात्मा शुगर्स प्रा.लि., जामनी, ता.सेलू, जि.वर्धा | खाजगी | ४४२.३८ |
| १४६ | पुर्ती शुगर्स लि.,खुर्सापूर, ता. उमरेड, जि.नागपूर | खाजगी | ६६७.९५ |
| १४७ | वैनगंगा शुगर्स लि., देव्हाडा, ता, मोहाडी,जि.भंडारा | खाजगी | ५२०.५४ |
| १४८ | नॅचरल ग्रोवर्स प्रा. लि.,ता.लाखंदूर, जि.भंडारा | खाजगी | १६७.२० |

**शासन निर्णय शुध्दिपत्रक दिनांक २८.०९.२०१५ मधील १ कारखाना वगळून २ कारखाने अंतर्भूत करण्यात आले.**

**ब) शासन निर्णय ५/०९/२०१५ नुसार पात्र साखर कारखाने (२२)**

| | | | |
|---|---|---|---|
| १४९ | सर सेनापती संताजी घोरपडे शुगर इंडस्ट्रिज लि., बेलवडी, ता. कागल, जि. कोल्हापूर | खाजगी | १६४२.०८ |
| १५० | ग्रीन पॉवर शुगर लि., गोपुज, ता. खाटाव, जि. सातारा | खाजगी | १८२८.४६ |
| १५१ | लोकनेत बाबुराव पाटीला ॲग्रो इंडस्ट्रिज लि., लक्ष्मीनगर, ता. मोहोळ, जि. सोलापूर | खाजगी | २३०८.६८ |
| १५२ | भैरवनाथ शुगर वर्क्स लि., लवंगे, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | खाजगी | १०८०.२९ |
| १५३ | युटोपियन शुगर्स लि., कचरेवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर | खाजगी | १२७१.३८ |
| १५४ | शंकररत्न शुगर (शिवरत्न उद्योग) लि., अलेगांव, ता. माढा, जि. सोलापूर | खाजगी | ५६५.८८ |
| १५५ | बबनरावजी शिंदे शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि., तुर्क पिंपरी, ता. बार्शी, जि. सोलापूर | खाजगी | ५५२.२९ |
| १५६ | गणेश ( डॉ. वि.वि.पाटील - प्रवरानगर) सह.सा.का. लि., रांजणगांव, ता. राहाता, जि. अहमदनगर | सहकारी | ८८०.७० |
| १५७ | पियुष (नगर तालुका) शुगर लि., वाळकी, ता. जि. अमदनगर | खाजगी | ४९६.५२ |
| १५८ | श्री साईकृपा शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि., युनिट-१, देवदैठण, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | खाजगी | ७२०.९८ |
| १५९ | श्री साईकृपा शुगर ॲन्ड अलाईड इंडस्ट्रिज लि., युनिट-२, हिरडगांव, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | खाजगी | १३९५.४० |
| १६० | संत मुक्ताई शुगर ॲन्ड एनर्जी लि., घोडसगांव, ता. मुक्ताईनगर, जि. जळगांव | खाजगी | २३४.८३ |

| | | | |
|---|---|---|---|
| १६१ | संत एकनाथ - सचिन घायाळ शुगर मिल्स लि.. संत एकनाथ नगर. ता. पैठण. जि. औरंगाबाद | खाजगी | ६०८.१२ |
| १६२ | समर्थ सह.सा.का. लि.. युनिट-२ (सागर) तीर्थपुरी. ता. घनसांगवी, जि. जालना | सहकारी | ७८३.४२ |
| १६३ | श्रध्दा एनर्जी ॲन्ड इन्फास्ट्रकश्चर्स प्रा. लि., ता. परतुर, जि. जालना. | खाजगी | ५२८.३६ |
| १६४ | जय भवानी सह.सा.का. लि., शिवाजीनगर गढी, ता. गेवराई, जि. बीड | सहकारी | ७२३.८९ |
| १६५ | छत्रपती सह. सा.का. लि., सोनाजीनगर- सावरगांव, ता. माजलगांव, जि. बीड | सहकारी | २७४.८४ |
| १६६ | रत्नप्रभा शुगर्स- रेणुका शुगर्स लि., पाथरी, ता. पाथरी, जि. परभणी | खाजगी | ३७६.०९ |
| १६७ | बळीराजा साखर कारखाना लि., कनदखेड, ता. पुर्णा, जि. परभणी. | खाजगी | ३९३.३६ |
| १६८ | कुंटुरकर शुगर ॲन्ड ॲग्रो प्रा. लि., मोहननगर कुंटुर, ता. नायगांव, जि. नांदेड | खाजगी | ४१५.८८ |
| १६९ | कंचेश्वर शुगर लि., मंगरुळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद | खाजगी | ८०४.९४ |
| १७० | विकास (प्रियदर्शनी) सह. सा.का.लि., युनिट-२ तोंडार, ता. उदगीर, जि. लातूर | सहकारी | ८८९.५७ |
| **(ब)** | **एकूण** | | **१८७७५.९७** |
| | **क) शासन निर्णय दि.९/१२/२०१५ नुसार पात्र साखर कारखाने (६)** | | |
| १७१ | महाडिक शुगर्स लि., ता. राधानगरी, जि. कोल्हापूर | खाजगी | ६०४.२० |
| १७२ | माणगंगा सह. सा. का. लि., सोनारसिध्दनगर, ता. आटपाडी, जि. सांगली | सहकारी | ६६३.०४ |
| १७३ | कुमुदा-रयत सह.सा.का. लि., शेवाळवाडी, ता. कराड, जि. सातारा | खाजगी | ६११.९० |
| १७४ | स्वामी समर्थ सह. सा. का. लि., दहिटणे, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर | खाजगी | ७४७.१२ |
| १७५ | चोपडा शेतकरी सह.सा.का. लि., चहार्डी, ता. चोपडा, जि. जळगांव | सहकारी | ६४१.८० |
| १७६ | महाराष्ट्र शेतकरी शुगर लि., श्री उत्तम नगर, साईखेड, ता. सोनपेठ, जि. परभणी | खाजगी | ५६९.७४ |
| **(क)** | **एकूण** | | **३८३७.८०** |

शासन निर्णय क्रमांक ससाका-२०१६/प्र.क्र.३४५/३-स, दिनांक २१.०४.२०१६ चे सहपत्र.

प्रपत्र-२ गाळप हंगाम २०१३-१४ मध्ये उत्पादीत व निर्यात केलेल्या कच्च्या साखरेच्या आधारे सॉफ्ट लोन योजने बाबत कारखाना निहाय तपशिल

| अ.क्र. | कारखान्याचे नांव | कच्ची साखर (मे.टन) | योजनेनुसार पात्र कर्ज मर्यादा (रु. लाख) | हंगाम २०१४-१५ मधील ऊस बिल थकबाकी (दि.१५/०१/२०१६ अखेरील ऊस दर देयबाकी अहवालानुसार) (रु. लाख) |
|---|---|---|---|---|
| | **कोल्हापूर विभाग** | | | |
| १ | आजरा सह.सा.का. लि., गवसे ता. आजरा, जि. कोल्हापूर | १६२४३.०० | ४२८.८२ | ०.०० |
| २ | श्री छत्रपती राजाराम सह.सा.का. लि.,कसबा बावडा ता. करवीर, जि. कोल्हापूर | ५२००.०० | १३७.२८ | ०.०० |
| ३ | श्री दत्त शेतकरी शिरोळ सह.सा.का. लि.,दत्तनगर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर | ९७७१.९० | २५७.९८ | ०.०० |
| ४ | श्री तात्यासाहेब कोरे वारणा सह.सा.का. लि.,वारणानगर , ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १९३७४.०० | ५११.४७ | ०.०० |
| ५ | इको केन शुगर एनर्जी लि., म्हाळुंगी, ता. चंदगड, जि. कोल्हापूर | ५७००.०० | १५०.४८ | ०.०० |
| ६ | माणगंगा सह.सा.का. लि., सोनारसिध्दनगर, ता. आटपाडी, जि. सांगली | २४४२५.०० | ६४४.८२ | ०.०० |
| ७ | रा. बा. पाटील सह.सा.का. लि.,साखराळे, ता. वाळवा, जि. सांगली | ४२४५८.०० | ११२०.८९ | ०.०० |
| ८ | सोनहिरा सह.सा.का. लि.,वांगी, ता. कडेगांव, जि. सांगली | १५६०.०० | ४१.१८ | ०.०० |
| ९ | वसंतदादा शेतकरी सह.सा.का. लि., माधवनगर रोड,ता. मिरज, जि. सांगली | १३१९.०० | ३४.८२ | ०.०० |
| १० | सर्वोदय (रा.बा.पाटील) सह.सा.का. लि.,कारंदवाडी, ता. वाळवा, जि. सांगली | ५२००.०० | १३७.२८ | ०.०० |
| ११ | उदगिर शुगर ॲन्ड पॉवर लि.,बामणी पारे ता. खानापूर, जि. सांगली | १२०००.०० | ३१६.८० | ०.०० |
| | **विभाग एकूण** | १४३२५०.९० | ३७८१.८२ | ०.०० |
| | **पुणे विभाग** | | | |
| १२ | अजिंक्यतारा सह.सा.का. लि.,शेंद्रे, ता. जि. सातारा | १५२००.०० | ४०१.२८ | ०.०० |
| १३ | य. मो. कृष्णा सह.सा.का. लि., रेठरे बु., ता. कराड, जि. सातारा | २६१६४.०० | ६९०.७३ | ०.०० |
| १४ | सह्याद्री सह.सा.का. लि., यशवंतनगर, ता. कराड, जि. सातारा | १६५६९.०० | ४३७.४२ | ०.०० |
| १५ | किसनवीर प्रतापगड साखर उद्योग लि.,सोनगांव, ता. जावळी, जि. सातारा | ३९२८६.५० | १०३७.१६ | ७११.९१ |
| १६ | जरंडेश्वर शुगर मिल्स लि., चिमणगांव, ता. कोरेगांव, जि. सातारा | ७७२९.१६ | २०४.०५ | ०.०० |
| १७ | कर्मयोगी शं. पाटील सह.सा.का. लि., म्हात्माफुलेनगर, बिजवडी,ता. इंदापूर, जि. पुणे | १२१५८.८० | ३२०.९९ | ०.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | दि माळेगांव सह.सा.का. लि.,शिवनगर, ता. बारामती, जि पुणे | १००००.०० | २६४.०० | ०.०० |
| १९ | दौंड शुगर्स लि..आलेगांव. ता. दौंड, जि. पुणे | २२४००.०० | ५९१.३६ | ०.०० |
| २० | श्री आदिनाथ सह.सा.का. लि.. आदिनाथनगर. ता. करमाळा. जि. सोलापूर | ७५००.०० | १९८.०० | १३०६.५४ |
| २१ | स.शि. वसंतराव काळे सह.सा.का. लि..चंद्रभागानगर. ता. पंढरपूर. जि. सोलापूर | ५२००.०० | १३७.२८ | ०.०० |
| २२ | श्री सिध्देश्वर सह.सा.का. लि..कुमठे, ता. उत्तर सोलापूर. जि. सोलापूर | ३५२९९.१० | ९३१.६९ | ०.०० |
| २३ | श्री शंकर सह.सा.का. लि..सदाशिवनगर. ता. माळशिरस. जि. सोलापूर | १०९०९.६० | २८८.०१ | १४२२.९३ |
| २४ | श्री विठ्ठल सह.सा.का. लि.,गुरसाळे, ता. पंढरपूर, जि. सोलापूर | ९३४०.०० | २४६.५८ | ०.०० |
| २५ | विठ्ठल कार्पोरेशन लि., ता. माढा, जि. सोलापूर | १३११७.२० | ३४६.२९ | ०.०० |
| २६ | जकराया शुगर्स लि., ता. मोहोळ, जि. सोलापूर | ११०५०.०० | २९१.७२ | ०.०० |
| २७ | इंद्रेश्वर शुगर मिल्स लि., ता. बार्शी, जि. सोलापूर | ८०००.०० | २११.२० | ०.०० |
| २८ | शेतकरी साखर कारखाना (चांदापूरी) लि., माळशिरस, जि. सोलापूर | १६९५२.०० | ४४७.५३ | ५८८.६० |
| | **विभाग एकूण** | २६६८६७.३६ | ७०४५.३० | ४०२९.९८ |
| | **अहमदनगर विभाग** | | | |
| २९ | मुळा सह.सा.का. लि., ता. नेवासा, जि. अहमदनगर | ६६८९.८० | १७६.६१ | ०.०० |
| ३० | स.म. भाऊसाहेब थोरात सह.सा.का. लि., ता. संगमनेर, जि. अहमदनगर | २०५२४.२० | ५४१.८४ | १२२८.८० |
| ३१ | संजीवनी (टाकळी) सह.सा.का. लि. ता. कोपरगांव, जि. अहमदनगर | ३९८८८.१० | १०५३.०५ | ०.०० |
| ३२ | स.म. शिवाजीराव नागवडे सह.सा.का. लि., ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर | १००००.०० | २६४.०० | ०.०० |
| ३३ | श्री वृध्देश्वर सह.सा.का. लि., ता. पाथर्डी, जि. अहमदनगर | १९३००.०० | ५०९.५२ | ५००.६४ |
| ३४ | गंगामाई इंडस्ट्रिज अॅन्ड कन्स्ट्रकशन लि., ता. शेवगांव, जि. अहमदनगर | २५५७७.०० | ६७५.२३ | ०.०० |
| ३५ | प्रसाद शुगर अॅन्ड अलाईड अॅग्रो प्रोडक्ट्स लि.,वांबोरी, ता. राहूरी, जि. अहमदनगर | १२००.०० | ३१.६८ | १५९.८९ |
| | **विभाग एकूण** | १२३१७९.१० | ३२५१.९३ | १८८९.३३ |
| | **औरंगाबाद विभाग** | | | |
| ३६ | वैद्यनाथ सह.सा.का.लि.,पांगरी, ता.परळी वैद्यनाथ जि.बीड | १४००.०० | ३६.९६ | ०.०० |
| ३७ | माजलगांव सह.सा.का.लि., सुंदरनगर, ता.माजलगांव, जि.बीड | ३९२३०.०० | १०३५.६७ | ०.०० |
| | **विभाग एकूण** | ४०६३०.०० | १०७२.६३ | ०.०० |
| | **नांदेड विभाग** | | | |
| ३८ | पुर्णा सह.सा.का.लि., वसमतनगर ता.वसमतनगर, जि.हिंगोली. | ३८३००.०० | १०११.१२ | ४७७.५८ |
| ३९ | पुर्णा सह.सा.का. लि.,युनिट-2 (बाराशिव हनुमान) जवळाबाजार, ता.औंढा नागनाथ, जि.हिंगोली. | २३६००.०० | ६२३.०४ | ०.०० |
| ४० | डॉ.बाबासाहेब आंबेडकर सह.सा.का.लि.,केशेगांव, ता.जि.उस्मानाबाद. | २००००.०० | ५२८.०० | ०.०० |
| ४१ | सिद्धी शुगर्स, लि., बालाघाट, महेशनगर, उजना, ता.अहमदपूर, जि.लातूर. | ५२००.०० | १३७.२८ | १५१.७८ |